




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 शुक्रवार दि. १० जुलै २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २१० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधानमंडळाच्या डिजिटल डॅशबोर्डचे उद्घाटन

- विधान परिषद सभापती, प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष, ॲड. राहुल नार्वेकर उपस्थित
- प्रलंबित संसदीय आयुधांच्या रिअल-टाईम पाठपुराव्याला गती
- विधानमंडळाच्या डिजिटल परिवर्तनात महत्त्वाचा टप्पा

मुंबई (समर्थ गांवकरी)

**महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजात पारदर्शकता, गती आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत विविध प्रलंबित संसदीय आयुधांच्या डिजिटल पाठपुराव्यासाठी विकसित करण्यात आलेल्या अत्याधुनिक डॅशबोर्डचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.**

या डॅशबोर्डमुळे तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चेच्या सूचना, विशेष उल्लेख, औचित्याचे मुद्दे आदी संसदीय आयुधांच्या प्रलंबिततेची रिअल–टाईम माहिती उपलब्ध होणार असून शासन आणि विधानमंडळ यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

विधानभवन येथे झालेल्या या कार्यक्रमास विधान परिषद सभापती, प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषद उप सभापती सचिन अहिर, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधान मंडळाचे सचिव–१ जितेंद्र भोळे, सचिव–३ विलास आठवले, सचिव–४ शिवदर्शन साठ्ये उपस्थित होते.





यावेळी विधानमंडळ सचिव जितेंद्र भोळे यांनी डॅशबोर्ड विषयी माहिती दिली आणि संगणकीकरण आणि डिजिटल परिवर्तनाच्या वाटचालीचा आढावा सादर केला. जुलै २०२२ मध्ये दोन्ही सभागृहे पूर्णपणे डिजिटल करण्याचा संकल्प करण्यात आला. त्याअंतर्गत सदस्यांच्या प्रत्येक डेस्कवर अत्याधुनिक मल्टिमीडिया कॉन्फरन्स सिस्टिम बसविण्यात आली. या प्रणालीद्वारे सदस्यांना सभागृहाच्या दैनंदिन कामकाजाची माहिती, विधानमंडळाच्या संकेतस्थळावरील माहिती तसेच इंटरनेटवरील आवश्यक संदर्भ सहज उपलब्ध होत आहेत. भविष्यात ग्रंथालयातील संदर्भ साहित्यही एका क्लिकवर सभागृहात उपलब्ध करून देण्याची सुविधा विकसित करण्यात येत आहे, अशी माहिती जितेंद्र भोळे यांनी दिली.

याच काळात विधानमंडळाच्या महत्त्वाकांक्षी डिजिटलायजेशन प्रकल्पालाही वेग देण्यात आला. सन १९३७ पासूनच्या कार्यवाही वृत्तांचे डिजिटायझेशन करण्यात आले असून, २०13 पासूनच्या सभागृहाच्या दृकश्राव्य कार्यवाहीचेही डिजिटल संकलन करण्यात आले आहे. त्यामुळे ऐतिहासिक संसदीय नोंदी संशोधक, सदस्य आणि प्रशासनासाठी अधिक सुलभ होणार आहेत.

डिजिटल प्रती उपलब्ध करून देण्याची व्यवस्था

राजपत्रे, विधेयके, अर्थसंकल्पीय प्रकाशने, राज्यपालांची अभिभाषणे, विधानमंडळ समित्यांचे अहवाल, चौकशी समित्यांचे अहवाल, शासकीय महामंडळे व विद्यापीठांचे अहवाल, निवडणूकविषयक निर्णय, शासनाच्या योजना व धोरणे, सदस्यांची माहिती तसेच महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय यांच्याही डिजिटल प्रती उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. डिसेंबर २०२४ मध्ये या डिजिटल परिवर्तन मोहिमेला अधिक गती मिळाली. सभापतींच्या पुढाकारातून प्रथम त्यांच्या कार्यालयात ई–ऑफिस प्रणाली कार्यान्वित करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण विधानमंडळ सचिवालयात ई–ऑफिस प्रणाली प्रभावीपणे लागू करण्यात आली असून आज बहुतांश प्रशासकीय कामकाज ई–ऑफिसद्वारे पार पडत आहे. मंत्रालयासह क्षेत्रीय स्तरावरील कामकाज आणि विविध समित्यांच्या कार्यपद्धतीतही या प्रणालीचा मोठा उपयोग होत आहे. आगामी काळात ई–एचआरएमएस, महापार आणि ई–आरटीआय यांसारख्या प्रणालींचाही समावेश करण्यात येणार आहे.

संपूर्ण प्रक्रिया डिजिटल होणार

उद्घाटन झालेल्या डिजिटल डॅशबोर्डमुळे संसदीय आयुधांच्या पाठपुराव्याची पारंपरिक कागदी पद्धत संपुष्टात येऊन संपूर्ण प्रक्रिया डिजिटल होणार आहे. या डॅशबोर्डद्वारे आयुधांची सद्यस्थिती, प्रलंबित बाबी आणि विभागनिहाय माहिती तत्काळ उपलब्ध होणार आहे. तसेच कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे या समितीच्या कामकाजातही या प्रणालीचा प्रभावी उपयोग होणार आहे. मुख्य सचिव तसेच विविध मंत्रालयीन विभागांचे सचिव यांनाही त्यांच्या विभागातील प्रलंबित संसदीय आयुधांचा ऑनलाईन पाठपुरावा करता येणार असल्याने उत्तर सादर करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान आणि जबाबदार होईल. शासनाचे विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी हा डॅशबोर्ड महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. विधानमंडळाच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने उचललेले हे पाऊल राज्यातील संसदीय कामकाज अधिक आधुनिक, पारदर्शक आणि परिणामकारक बनविणारे ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## बनावट दूध रॅकेटची व्याप्ती वाढली; मुख्य आरोपींच्या घरांवर मंचर पोलीस आणि एलसीबीचा छापा, मोठ्या 'माशां'पर्यंत तपास पोहोचण्याची शक्यता

मंचर (समर्थ गांवकरी)

राज्यभर गाजत असलेल्या मंचर येथील बनावट दूध भेसळ प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला असून मंचर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने मुख्य आरोपींच्या घरांवर छापेमारी करत महत्त्वाचे पुरावे जप्त केले आहेत. मंचर येथील संदीप लोढा, अवसरी बुद्रुक येथील सुशांत हिंगे आणि पिंपळगाव खडकी येथील ठकसेन आरगडे यांच्या निवासस्थानी कारवाई करण्यात आली. या कारवाईत लॅपटॉप, व्यवहारांच्या नोंदी असलेल्या वह्या तसेच इतर महत्त्वाची कागदपत्रे पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत.

जप्त करण्यात आलेल्या साहित्याच्या आधारे आरोपींचे आर्थिक व्यवहार, रसायनांचा पुरवठा, ग्राहकांचे जाळे आणि या रॅकेटशी संबंधित इतर व्यक्तींची माहिती उघड होण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे. या नोंदींच्या आधारे बनावट दूध निर्मिती आणि रसायन पुरवठ्याच्या साखळीतील आणखी काही प्रभावशाली व्यक्तींची नावे समोर येण्याची शक्यता असल्याची चर्चा सुरू आहे.दरम्यान, या गाजलेल्या प्रकरणात मंचर पोलिसांनी आतापर्यंत २६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास अधिक व्यापक करण्यात आला आहे. जप्त केलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि दस्तऐवजांची तांत्रिक तपासणी सुरू असून त्यातून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या कारवाईमुळे बनावट दूध रॅकेटमागील संपूर्ण साखळी उघडकीस येणार का, याकडे राज्यभरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## 'वारकरी सेवेतून मानवतेचा वसा' - समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप

जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)



वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवाया उदात्त भावने तून समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर बेल्हे,यांच्या वतीने चैतन्य महाराज ओतूर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्या निमित्त राजूरी येथे वारकऱ्यां साठी मोफत आरोग्य तपासणी मोफत औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमाला वारकऱ्यांचाउत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.पायी वारी दरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक थकवा,सांधेदुखी, पायदुखी,सर्दी,ताप,रक्तदाब तसेच इतर किरकोळ आजारां ची तज्ज्ञ डॉक्टरांकडूनतपासणी करण्यात आली.

आवश्यकतेनुसार आयुर्वेदिक औषधांचे मोफत वितरण करून आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले.समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या सेवा भावी उपक्रमामुळे वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करत समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.

या उपक्रमाचे नियोजन समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे प्राचार्य डॉ.संजय लोंढे,डॉ.रमेश पाडेकर,डॉ. मधुसूदन कुऱ्हाडे,डॉ.रश्मी चव्हाण,डॉ.श्रवंती तोडचिरकर, डॉ.जयश्री मते,डॉ. कृतिका कांबळे,डॉ.स्नेहल गायकवाड तसेच प्रा.मनसी गवळी,यशवंत फापाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## समाजभूषण हितेश गायकवाड, छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप पुरस्काराने सन्मानित



ठाणे (समर्थ गांवकरी)

स्वराज्यातून सुराज्याच्या नवनिर्माणा चे अधिष्ठान म्हणजे स्वराज्य प्रतिष्ठान. आणि शिवक्रांती प्रतिष्ठान तर्फे शिव राज्याभिषेक गौरव दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव व राजमाता जिजाऊ कर्तृत्व गौरव पुरस्कार मोठ्या दिमाखात चार जुलै मुंबई येथे पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन येथील मैत्री संस्था आणि सामाजिक समन्वय समिती सोबतच सर्वेसर्वा अध्यक्ष प्रमोद आप्पा पाटील, स्वराज्य प्रतिष्ठानचे सचिव श्री. सुरेश भोईर सर, तसेच शिवक्रांती प्रतिष्ठानचे सर्वे सर्व डॉ.राजूभाऊ चौधरी यांच्या प्रयत्नातून या सोहळ्याला रंगतदार चकाकी आली होती. उद्घाटक मध्ये डॉ. सुधाकर सुराडकर, माजी राज्यमंत्री ज्योतीताई ठाकरे आणि संभाजीराव राजे जाधव राव यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा दिमखात पार पडला. समाजासाठी विशेष प्रकारचे कार्य करणाऱ्या विशेष लोकांसाठी हा पुरस्कार जाहीर केलेला असतो त्यात प्रामुख्याने आरोग्य विभागाला पहिले प्राधान्य दिलेले होते. बऱ्याच धावपळ करणाऱ्या आणि मेहनती लोकांना या संस्थेने त्यांचा उत्साह वाढवण्या साठी पाचारण केलेले होते या वेळेस कोणाच्याही सुखदुःखात धावून जाणारे आणि योग्य ते शासना मार्फत मदत करणारे समाज भूषण,समाज वैभव हितेश पांडुरंग गायकवाड (आरोग्य विभाग) यांचा शाल आणि स्वराज्य ट्रॉफी देऊन माना सन्मानाने सत्कार करण्यात आला यावेळेस प्रमुख अतिथी म्हणून माननीय अभिजीत राणे, शिवमती अनिताताई काळे, सुभाषराव गायकवाड,प्रेरणा गायकवाड,अभिनेत्री पियू चव्हाण, मंगला परब,दिलीप नारद,सुरेश साळवी आणि संगीता गुरव उपस्थित होते माणसाने माणुसकी साठी प्रत्येक माणसाला ह्याच जन्मात ओळखले पाहिजे आणि मदतीचा हात पुढे केल्या गेला पाहिजे या शब्दांमध्ये व वक्त्यांनी आपल्या आदर्श मधून स्पष्ट केले. रवी भातडे,एम. नटराज आशिष सातपुते,उद्धव झगडे आणि संस्थांचे सर्व आदरणीय निमंत्रक आभार प्रदर्शन करून या बहारदार सोहळ्याची सांगता केल्या गेली.













# मराठवाड्यातील चार जिल्ह्यात भूकंपाच्या धक्क्यांमुळे भीती

मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर जिल्ह्यात भूकंपाचे धक्के बसल्यामुळे सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. गुरुवार दिनांक ९ जुलैच्या पहाटे दोन तासांमध्ये चार भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांनी रात्र जागून काढली. लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे झालेल्या प्रलयकारी भूकंपाची आठवण यानिमित्ताने काढली जात आहे.

हिगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ, कळमनुरी व वसमत तालुक्यात गेल्या सहा वर्षांत ३७ पेक्षा जास्त सौम्य भुकंपाची नोंद झाली आहे. गुरुवारी पहाटे ०१:३७ ते ०३:२३ या दोन तासांमध्ये चार भूकंपाचे धक्के जाणवले. एकाच दिवशी चार धक्के बसण्याची ही हिंगोली जिल्ह्यातील पहिलीच वेळ आहे.पहिला धक्का ४.६ रिश्टर स्केल एवढा होता. या भूकंपाचे केंद्रबिंदू सिर्ली –पांग्रा शिंदे गाव नोंदविण्यात आले. त्याची खोली १० किलोमीटर एवढी दर्शविलेली आहे. ९ जुलै रोजी पहाटे ०१:३७ वाजता हा भूकंपाचा धक्का जाणवला. त्यानंतर दुसरा धक्का ३.६ रिश्टर स्केल या क्षमतेचा होता. या धक्क्याचा केंद्रबिंदू काकडधाबा गाव नोंदविण्यात आले. त्याचीही खोली १० किलोमीटर अशी दिसत आहे. भूकंपाचा हा दुसरा धक्का गुरुवारी पहाटे ०२:१५ वाजता जाणवला. त्यानंतर मात्र हिंगोली व नांदेड जिल्ह्यामधील नागरिक प्रचंड घाबरलेल्या अवस्थेत होते. नागरिकांनी रात्रीच एकमेकांना फोन करून भूकंप झाल्याची खात्री करून घेतली. मराठवाड्यातील चार जिल्ह्यात या भूकंपाच्या धक्क्याने नागरिकांनी रात्र जागून काढली. भूकंपाचा तिसरा धक्का गुरुवारी पहाटे २ वाजून १७ मिनिटाला जाणवला. या भूकंपाची तीव्रता ३.९ रिश्टर स्केल एवढी नोंदविण्यात आली. त्यानंतर पुन्हा भूकंपाचा

चौथा धक्का जाणवला. त्याची तीव्रता ४.१ रिश्टर स्केल अशी नोंदविण्यात आली. भूकंपाचे केंद्रबिंदू काकडधाबा गाव हे नोंदविण्यात आले. त्याचीही खोली १० किलोमीटर अशी दर्शविण्यात आली. ९ जुलै रोजी पहाटे ३:२३ वाजता बसलेल्या भूकंपाच्या चौथ्या धक्क्यामुळे मात्र अनेकांनी घराबाहेर अंगणात तसेच रस्त्यावर थांबून रात्र काढली. ११ एप्रिल रोजी हिंगोली जिल्ह्यात ४.७ रिश्टर स्केल एवढ्या तीव्रतेचा भूकंप झाला होता. त्या भूकंपाच्या धक्क्यानंतर नागरिक अगोदरच घाबरलेले आहेत. कारण चार पेक्षा अधिक तीव्रतेचा भूकंपाचा धक्का हा धोकादायकच मानला जातो. हिंगोली जिल्ह्यातील पांगरा शिंदे , कळमनुरी तसेच औंढा नागनाथ या परिसराला हे भूकंपाचे धक्के अधिक तीव्रतेने जाणवले. हिंगोली जिल्ह्यात अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यात प्रशासनाकडून आपत्ती विषयक पाहणी करण्याची मागणी होत आहे.

मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड व परभणी जिल्ह्यात हे धक्के जाणवल्याने लोकांनी रात्रभर एकमेकांची चौकशी करत जागून अक्षरशः देवाचे स्मरण केले. रात्रीची वेळ असल्याने प्रशासनाने देखील म्हणावी तशी दखल घेतली नाही. नागरिकांमध्ये प्रचंड घबराहट असताना देखील कसल्याही प्रकारचे आवाहन करण्यात आले नाही, अशी तक्रार अनेक ग्रामस्थांनी केली. भूकंप किंवा मोठा पाऊस झाला तर कच्च्या घरांना सर्वाधिक धोका असतो. त्यामुळे अशा घरात राहणाऱ्यांनी अधिक दक्ष राहणे आवश्यक असते. प्राथमिक माहितीनुसार कोणतीही जीवित अथवा वित्तहानी भूकंपामुळे झालेली नाही.भूकंपाचे सौम्य धक्के लातूर जिल्ह्यातील काही ठिकाणी जाणवले. लातूर शहर तसेच निलंगा भागात धक्के जाणवल्याची माहिती आहे. तथापि प्राथमिक माहितीनुसार कसलीही जीवितहानी किंवा वित्तहानीची नोंद नाही, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे. नागरिकांनी भूकंपाचे धक्के बसत असताना पटकन मोकळ्या जागेत जावे, विशेषत कच्चे बांधकाम, (दगड मातीचे बांधकाम) असलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाने दिलेल्या अधिकृत माहितीची व सूचनांची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे यापूर्वी मोठा भूकंप झाला होता. त्यामुळे अनेकांना जीव गमवावा लागला. तसेच मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली होती. त्या भूकंपाची भीती मराठवाड्यातील नागरिकांमध्ये आजही आहे. जेव्हा जेव्हा भूकंपाचे धक्के बसतात तेव्हा मराठवाड्यात किल्लारीच्या भूकंपाची आठवण काढली जाते. तसेच त्या प्रसंगाचे अनुभव देखील अनेक जण कथन करत असतात. अलीकडच्या काळात मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात अनेकदा भूकंपाचे धक्के बसले. असाच अनुभव नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनाही आलेला आहे. भूकंपाचे धक्के जास्तच बसत असल्याने आता नागरिकांना जास्तच भीती वाटत आहे. किल्लारीच्या भूकंपामुळे काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले होते. त्यामुळे भूकंप हा जास्त वेळ देत नाही, या भीतीने अनेकांना त्रासून सोडले आहे.

**डॉ. अभयकुमार दांडगे**
**मराठवाडा वार्तापत्र**

# शेठ एन. के. टी. टी. महाविद्यालयात पुरुषांच्या मानसिक आरोग्याबद्दल जनजागृती




**ठाणे (समर्थ गांवकरी)**

पुरुष मानसिक आरोग्य जनजागृती महिन्याच्या निमित्ताने दिनांक २९ जून २०२६ रोजी शेठ एन. के. टी. टी. महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाद्वारे लिटररी असोसिऐशन यांच्या सहकार्याने विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश पुरुषांच्या मानसिक आरोग्याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे, मानसिक आरोग्याविषयी असलेले गैरसमज दूर करणे आणि भावनिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणे हा होता.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. हिमांशी मनसुखानी, आय. क्यू. ए. सी समन्वयक डॉ. मानोशी बागची, मानसशास्त्र विभागाच्या प्रभारी सायली शिंदे, तसेच लिटररी असोसिऐशनचे सदस्य प्रणव भामरे आणि शिशीर आंगणे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात पुरुषांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित लघुपट सादर केला गेला, तसेच प्रभावी प्रहसन आणि काव्यवाचन यांद्वारे मानसिक ताण, भावनिक संघर्ष, सामाजिक अपेक्षा आणि मानसिक आरोग्याविषयी संवादाचे महत्त्व यांसारख्या विषयांवर संवेदनशीलपणे प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी मानसिक आरोग्य ही प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची मूलभूत गरज असल्याचे अधोरेखित केले. विशेषतः पुरुषांनी मानसिक तणाव, नैराश्य किंवा भावनिक अडचणींबाबत मनमोकळेपणाने संवाद साधणे आणि मानसिक आरोग्याला शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्व देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध कलात्मक उपक्रम हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून समाजात पुरुषांच्या मानसिक आरोग्याविषयी संवेदनशीलता निर्माण करणारा एक प्रभावी संदेश ठरला.

# ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणातील अडचणी

शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो आणि राष्ट्राच्या प्रगतीलाही चालना मिळते. भारताने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली असली तरी आजही ग्रामीण भागातील अनेक मुले विविध अडचणींमुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहतात. ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करणे ही आजची महत्त्वाची गरज आहे.

ग्रामीण भागातील शिक्षणासमोरील सर्वात मोठी समस्या म्हणजे पायाभूत सुविधांचा अभाव. अनेक गावांमध्ये शाळांची इमारत जीर्ण अवस्थेत असते. काही ठिकाणी पुरेशा वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, स्वच्छतागृहे आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना अनुकूल वातावरणात शिक्षण घेणे कठीण जाते.

शिक्षकांची कमतरता हीदेखील एक गंभीर समस्या आहे. अनेक ग्रामीण शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असतात किंवा एका शिक्षकावर अनेक वर्गांची जबाबदारी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक वैयक्तिक मार्गदर्शन मिळत नाही. विशेषतः गणित, विज्ञान आणि इंग्रजी यांसारख्या विषयांच्या अध्यापनावर त्याचा परिणाम होतो.

आर्थिक अडचणींमुळेही अनेक मुले शिक्षणात मागे पडतात. काही कुटुंबांची आर्थिक परिस्थिती दुर्बल असल्याने विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश, वह्या किंवा इतर शैक्षणिक साहित्य मिळण्यात अडचणी येतात. काही वेळा मुलांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागते, त्यामुळे त्यांचे शिक्षण खंडित होते किंवा ते शाळा सोडतात.

डिजिटल युगात तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढले असले तरी ग्रामीण भागात इंटरनेट, संगणक आणि स्मार्ट उपकरणांची उपलब्धता मर्यादित आहे. कोविड–१९ काळात ही समस्या विशेषतः प्रकर्षाने जाणवली. अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाचा लाभ घेता आला नाही. त्यामुळे डिजिटल दरी अधिक स्पष्ट झाली.

मुलींच्या शिक्षणासंदर्भातही काही सामाजिक अडचणी आढळतात. लवकर विवाह, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, सामाजिक रूढी आणि जागरूकतेची कमतरता यांमुळे काही मुली शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. जरी परिस्थितीत सुधारणा होत असली तरी अजूनही या समस्यांकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ २०२०) मध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षक प्रशिक्षण, शाळांचे सक्षमीकरण आणि स्थानिक समुदायाचा सहभाग यांद्वारे शिक्षण अधिक प्रभावी करण्याचे उद्दिष्ट या धोरणात मांडले आहे.



**विजय दुंदा कातडे**
**(प्राथमिक शिक्षक)**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रणद खुर्द.**

या समस्यांवर मात करण्यासाठी शासन, शिक्षक, पालक आणि समाज यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. शाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, शिक्षकांची संख्या वाढवणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मदत करणे, डिजिटल साधने उपलब्ध करून देणे आणि शिक्षणाबाबत जनजागृती करणे ही काळाची गरज आहे.

शेवटी, ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण हे केवळ त्या मुलांच्या भविष्याशी संबंधित नसून देशाच्या विकासाशीही जोडलेले आहे. प्रत्येक मुलाला समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळाल्यासच खऱ्या अर्थाने शिक्षित, सक्षम आणि प्रगत भारताची निर्मिती होईल. ग्रामीण मुलांचे शिक्षण हेच राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचे भक्कम पायाभूत कार्य आहे.

# प्रतिआयोध्या श्री क्षेत्र राममाळ उंचखडक बुद्रुक येथे श्री सद्गुरू यशवंतबाबा यांच्या ७९ वी पुण्यतिथी सोहळ्यास प्रारंभ..!!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

रविवार दि.०५/०७/२०२६ पासून सालाबादप्रमाणे प्रतिआयोध्या ‘श्री क्षेत्र राममाळ उंचखडक बुद्रुक,ता. अकोले,जि.अहिल्यानगर येथे श्री सद्गुरू यशवंतबाबा यांच्या ७९ वी पुण्यतिथी सोहळा अखंड हरिनाम सप्ताह तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन योगी केशवाबाबा चौधरी,ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख(इंदोरीकर),ह.भ.प.मनोहर बाबा भोर,ह.भ.प.विठ्ठल पंत गोंडे महाराज,ह.भ.प.दिपक महाराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे.घटस्थापना व धर्म ध्वजारोहन करत सप्ताहाचा शुभारंभ होणार असून दि.०५/०७/२०२६ ते ११/०७/२०२६ या सप्ताह काळात सायंकाळी ७:०० ते ९:०० या वेळेत नामांकित सर्वश्री ह.भ.प.कीर्तनकार यांचे हरिकीर्तन होणार आहे.कीर्तन संपल्यानंतर ९:०० नंतर गावातील अन्नदात्यांकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.सालाबादप्रमाणे समस्त बेलदार समाज महाराष्ट्र राज्य यांचे वतीने शनिवार दि.११/०७/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता तांभोळ व जांबुत येथून श्री क्षेत्र राममाळ उंचखडक बुद्रुक येथे पायी दिंडी सोहळा आयोजित केला आहे.सप्ताह सोहळ्याची सांगता रविवार दि.१२/०७/२०२६ रोजी होणार असून पहाटे ६:०० ते ८:०० वाजता ह.भ.प.मनोहर महाराज भोर(आंबाड) यांचे पुण्यतिथी निमित्त कीर्तन होईल.सकाळी ८:०० ते १०:०० या वेळेत उंचखडक बुद्रुक गावातून अतिशय प्रसन्न वातावरणात दिंडी प्रदक्षिणा काढण्यात येईल,दिंडी प्रदक्षिणा झाल्यानंतर सकाळी १०:०० ते १२:०० वाजता समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख(इंदोरीकर) यांचे काल्याचे कीर्तन होऊन नंतर समस्त बेलदार समाज महाराष्ट्र राज्य यांचे वतीने महाप्रसादाचा कार्यक्रम होऊन अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होईल. देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दशरथ सावंत साहेब,ट्रस्टचे उपाध्यक्ष अगस्ती पतसंस्थेचे चेअरमन तसेच अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोकराव देशमुख,ट्रस्टचे सरचिटणीस योगी केशवाबाबा चौधरी व विश्वस्त यांनी तालुक्यातील भाविक भक्तांना या आत्मोधारी संधीचा लाभ घेऊन बंधुत्वाची भावना वृद्धिगत करून कार्यक्रमाची शोभा वाढवण्याचे आव्हान केले आहे.






## जाहीर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालय...**

क्र.कावि/अभिलेख/मृत्यु नोंद/२३२/२०२४ पारनेर दि. २९/०६/२०२६

**अर्जदार – श्री. किरण अशोक पवार, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
**विरुध्द.... ग्रामपंचायत कार्यालय माळकुप,** ता.पारनेर, जि.अहिल्यानगर
**विषय – जन्म–मृत्यू नोंदी सुधारणा अधिनियम २००३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार **श्री. किरण अशोक पवार, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांनी **मुलाच्या जन्म** नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने **त्यांच्या जन्म** नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. **त्यांच्या मुलाच्या जन्माची** तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **विराट किरण पवार** | **मुलगा** | **०४/०२/२०१९** |

निबंधकांनी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या **मुलाच्या जन्म** नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २९/०६/२०२६** रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालय...**

क्र.कावि/अभिलेख/मृत्यु नोंद/२३७/२०२४ पारनेर दि. २९/०६/२०२६

**अर्जदार – श्री. अजय छबन गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
**विरुध्द.... ग्रामपंचायत कार्यालय माळकुप,** ता.पारनेर, जि.अहिल्यानगर
**विषय – जन्म–मृत्यू नोंदी सुधारणा अधिनियम २००३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार **श्री. अजय छबन गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांनी **मुलाच्या जन्म** नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने **त्यांच्या जन्म** नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. **त्यांच्या मुलाच्या जन्माची** तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **अभय अजय गांगुर्डे** | **मुलगा** | **०७/१२/२०१८** |

निबंधकांनी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या **मुलाच्या जन्म** नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २९/०६/२०२६** रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालय...**

क्र.कावि/अभिलेख/मृत्यु नोंद/२३८/२०२४ पारनेर दि. २९/०६/२०२६

**अर्जदार – श्री. शेखर छबन गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
**विरुध्द.... ग्रामपंचायत कार्यालय माळकुप,** ता.पारनेर, जि.अहिल्यानगर
**विषय – जन्म–मृत्यू नोंदी सुधारणा अधिनियम २००३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार **श्री. शेखर छबन गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांनी **मुलीच्या जन्म** नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने **त्यांच्या जन्म** नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. **त्यांच्या मुलीच्या जन्माची** तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **तनुजा शेखर गांगुर्डे** | **मुलगी** | **१९/०८/२०१८** |

निबंधकांनी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या **मुलीच्या जन्म** नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २९/०६/२०२६** रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालय...**

क्र.कावि/अभिलेख/मृत्यु नोंद/२३३/२०२४ पारनेर दि. २९/०६/२०२६

**अर्जदार – श्री. संजय राजु बर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
**विरुध्द.... ग्रामपंचायत कार्यालय माळकुप,** ता.पारनेर, जि.अहिल्यानगर
**विषय – जन्म–मृत्यू नोंदी सुधारणा अधिनियम २००३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. संजय राजु बर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांनी **मुलाच्या जन्म** नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने **त्यांच्या जन्म** नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. **त्यांच्या मुलाच्या जन्माची** तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **कृष्णा संजय बर्डे** | **मुलगा** | **१५/०६/२०१७** |

निबंधकांनी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या **मुलाच्या जन्म** नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २९/०६/२०२६** रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालय...**

क्र.कावि/अभिलेख/मृत्यु नोंद/२३४/२०२४ पारनेर दि. २९/०६/२०२६

**अर्जदार – श्री. प्रदिप भिवा गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
**विरुध्द.... ग्रामपंचायत कार्यालय माळकुप,** ता.पारनेर, जि.अहिल्यानगर
**विषय – जन्म–मृत्यू नोंदी सुधारणा अधिनियम २००३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार **श्री. प्रदिप भिवा गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांनी **मुलीच्या जन्म** नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने **त्यांच्या जन्म** नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. **त्यांच्या मुलीच्या जन्माची** तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **रिया प्रदिप गांगुर्डे** | **मुलगी** | **०१/१२/२०१९** |

निबंधकांनी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या **मुलीच्या जन्म** नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २९/०६/२०२६** रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर यांचे कार्यालय ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालय...**

क्र.कावि/अभिलेख/मृत्यु नोंद/२३६/२०२४ पारनेर दि. २९/०६/२०२६

**अर्जदार – श्री. सागर महादु गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर
**विरुध्द.... ग्रामपंचायत कार्यालय माळकुप,** ता.पारनेर, जि.अहिल्यानगर
**विषय – जन्म–मृत्यू नोंदी सुधारणा अधिनियम २००३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार **श्री. सागर महादु गांगुर्डे, रा. माळकुप,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांनी **मुलीच्या जन्म** नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने **त्यांच्या जन्म** नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. **त्यांच्या मुलीच्या जन्माची** तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | **भाग्यश्री सागर गांगुर्डे** | **मुलगी** | **१५/०८/२०१८** |

निबंधकांनी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या **मुलीच्या जन्म** नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २९/०६/२०२६** रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर**


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# संत निळोबाराय पायीदिंडी पालखी सोहळयाचे १० जुलैला प्रस्थान

**पालकमंत्री, जिल्हाधिकारी, सीईओ, एसपी,विविध मंत्री, पद्मभूषण अण्णा हजारे आदींची उपस्थिती**

**संत निळोबाराय पायीदिंडी पालखी सोहळयाचे १० जुलैला प्रस्थान..**

प्रतिनिधी/दत्ता गाडगे (समर्थ गांवकरी)

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान ब वर्ग तीर्थक्षेत्र आणि प्रति पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेले पारनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र पिंपळनेर येथील, संतनिळोबाराय महाराज यांच्या पिंपळनेर ते पंढरपूर पालखी सोहळ्याच्या नियोजनाची बैठक पालखी सोहळा प्रमुख गोपाळकाका म काशीर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.श्रीसंत निळोबाराय सेवा मंडळ व श्री संत निळोबाराय संस्थांच्या विद्यमाने, राज्यातील प्रमुख संतांपैकी एक असलेली

९ व्या क्रमांकाची मानाची पायीदिंडी पालखी सोहळा म्हणून ओळख असणाऱ्या, श्रीसंत निळोबाराय पायीदिंडी पालखी सोहळा या वर्षी श्रीक्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर या पालखी सोहळ्याचे प्रस्थान होणार असून,

संत निळोबारायांचा पायीदिंडी पालखी सोहळा हा शुक्रवार दि. १० जुलै २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून समाधी संजीवन समाधी मंदिराकडे होईल.

श्रीक्षेत्र पिंपळनेर येथून संत निळोबारायांच्या पालखी सोहळ्याचे दुपारी ३ वाजता संजीवन समाधी मंदिरातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होईल. त्या अगोदर एक तासाची किर्तनसेवा ह भ प मोहन आनंद महाराज परंदवडेकर पंढरपूर यांची होईल.या प्रसंगी भास्कर गिरीजी महाराज देवगड हे हजर राहणार आहेत. तसेच अनेक दिग्गज किर्तनकार व मोठ्या संख्येने वारकरी भाविकभक्त आणि दिंडी चालक विणेकरी व चोपदार महिलाभगिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

प्रस्थान प्रसंगीची महापूजा हि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांच्या हस्ते होईल.

तर, पालखीच प्रस्तानचा नारळ, अभंग गाथेचा प्रकाशन सोहळा, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील,राज्याचे उद्योग मंत्री ना.उदय सामंत व कृषिमंत्री ना.दत्तामामा भरणे,

ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे, पद्मश्री पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. सदर कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष पारनेरचे आमदार काशिनाथ दातेसर हे राहणार आहे.



**या वर्षी रथासाठी रुईछत्रपती दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष स्व.बंडू बापूराव साबळे यांच्याकडून, तर नगारा बैलगाडीसाठी सिद्धेश्वर पायी दिंडी सोहळाचे हभप अण्णासाहेब महाराज चत्तर यांची बैलजोडी सेवेस असणार आहे. तरी,१० जुलैला सकाळी १०:३० वाजता निळोबारायांच्या राहत्या वाड्यातून दिंडीचे प्रस्थान होणार आहे, सदर प्रस्थान प्रसंगी राज्यातील वारकरी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्रीसंत निळोबाराय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव सावंत यांनी केले आहे.**

याप्रसंगी संपत त्रिंबक गाजरे, विजय गुगळे, राजेंद्र पठारे, नाथा रासकर, गोरख सालके, लक्ष्मण खामकर, चांगदेव शिर्के, भाऊसाहेब लटांबळे, पांडुरंग रासकर, पांडुरंग साबळे, अण्णासाहेब चत्तर,पांडुरंग

सातपुते, तसेच पिंपळनेर ग्रामस्थ व पालखी सोहळ्यात सहभागी होणारे दिंडीचालक अध्यक्ष व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री तिलोक जैन विद्यालयाचे स्कॉलरशिप व एन.एम.एम.एस. परीक्षेतील यश :

पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)

शहरातील नामांकित अशा श्री तिलोक जैन विद्यालयचा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे आयोजित शिष्यवृत्ती (इयत्ता पाचवी व आठवी स्कॉलरशिप) तसेच एन.एन.एम.एस.परीक्षेचा निकाल अतिशय उल्लेखनीय लागला असून विद्यालयाचे तब्बल २२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत. यामध्ये इयत्ता ५ वी मध्ये शेळके अर्णव – २६० गुण, शिंदे अन्विता – २४८ गुण ,चव्हाण साईदिप – २४४ गुण, खंडागळे स्वरा – २४४ गुण, हराळ जिज्ञासा – २१२ गुण , भालके वैष्णव – २०८ गुण , टेकाळे श्रुतिका – २ज६ गुण तसेच इ . ८ वी मध्ये कु. श्रेया तुपे – २६८ गुण, खरमाटे अनन्या – २६० गुण, गुंजाळ अक्षया – २३८ गुण, कटारिया सन्मित – २३८ गुण, सोनटक्के संग्राम – २३८ गुण, फुटाणे श्रेया – २३२ गुण, चव्हाण सायली – २२२ गुण , लाड आर्या – २२० तसेच एन.एम. एम.एस . परीक्षेत आर्या लाड , खेडकर प्रतीक्षा , मिसाळ सोहम , खेडकर प्रणव ,बुधवंत भक्ती ,राख आराध्या व देखने धनश्री अशा एकूण २२ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत मानाचे स्थान पटकावले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा प्रमुख डॉ. अनिल पानखडे , श्रीमती नंदिनी मुथ्था , चंद्रकांत उदागे यासह त्यांचे सर्व सहकारी शिक्षक यांचे विशेष मार्गदर्शन लाभले .विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष चंपालाल गांधी ,सचिव सतिश गुगळे , कोषाध्यक्ष सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ.ललित गुगळे,राजेंद्र मुथ्था, धरमचंद गुगळे या सह कार्यकारी व सल्लागार मंडळाचे सर्व सदस्य तसेच गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड साहेब , विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी, उपमुख्याध्यापक अशोक गर्जे, पर्यवेक्षक भारत गाडेकर , सुधाकर सातपुते या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सह शिक्षण क्षेत्रातून शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पंढरपूर आषाढी वारी : अहिल्यानगर जिल्ह्यातून जाणाऱ्या दिंड्यांसाठी १०८ रुग्णवाहिका सेवा सज्ज



राहुरी (समर्थ गांवकरी)

आषाढी वारीनिमित्त अहिल्यानगर जिल्ह्यातून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या सर्व दिंड्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवेअंतर्गत सुमित कंपनीमार्फत १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुनियोजित पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक वारकऱ्यांना पायी प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारची आरोग्यविषयक अडचण उद्भवल्यास तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज अशा १०८ रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत.

जिल्हा व्यवस्थापक कांचन बिडवे (आहेर )यांनी सांगितले की, अहिल्यानगरमधून तळेगाव, कर्जत या मार्गावरून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून आवश्यक त्या ठिकाणी १०८ रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी व आवश्यक औषधसामग्रीसह ही सेवा उपलब्ध राहणार आहे.

यासोबतच, महाराष्ट्र शासन आणि सुमित कंपनी यांच्या समन्वयातून अहिल्यानगर जिल्ह्यात १०८ रुग्णवाहिका सेवा सुरळीतपणे सुरू असून, मा. डॉ. संजय घोगरे यांनी स्वतः या व्यवस्थेवर लक्ष ठेवून संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अहिल्यानगरमध्ये वारकऱ्यांना १०८ रुग्णवाहिकेद्वारे सेवा देण्यात येत आहे. अहिल्यानगर ते तळेगाव ते कर्जत मार्गावरील पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका राखीव ठेवण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन व सुमित कंपनीच्या माध्यमातून १०८ रुग्णवाहिका सेवा सुरळीत सुरू आहे. मा. डॉ. संजय घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण यंत्रणा कार्यरत असून वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

# पेरणी पाण्यात... बळीराजा संकटात! अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे धाव; पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाईची मागणी

लिंगदेव (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यात गेल्या आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार आणि संततधार पावसाने लिंगदेव, कोतूळ व ब्राह्मणवाडा महसूल मंडळातील शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. नुकतीच केलेली खरीप हंगामातील पेरणी अक्षरशः पाण्यात गेली असून अनेक शेतांमध्ये पाणी साचल्याने सोयाबीन, मका, भात तसेच कोबी, फ्लॉवर, टोमॅटो यांसारख्या नगदी पिकांचे बियाणे व रोपे कुजून नष्ट झाली आहेत. त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी अकोले तहसीलदारांना निवेदन देत तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी मोठ्या आशेने कर्ज काढून किंवा साठवलेल्या पैशातून ट्रॅक्टरद्वारे मशागत, बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि इतर शेतीकामांवर मोठा खर्च करण्यात आला. मात्र निसर्गाच्या अवकृपेने काही दिवसांतच सर्व श्रम आणि पैसा वाया गेला. सततच्या पावसामुळे अनेक शेतांमध्ये गुडघाभर पाणी साचल्याने बियाणे उगवण्यापूर्वीच कुजले, तर उगवलेली रोपेही वाहून गेली.

अनेक ठिकाणी शेतबांध फुटल्याने सुपीक माती वाहून गेली असून शेतीचे मोठ्या प्रमाणावर धूप झाले आहे. परिणामी शेतकऱ्यांसमोर आता दुबार पेरणीचे मोठे संकट उभे ठाकले आहे. मात्र आधीच मोठा आर्थिक फटका बसल्याने दुबार पेरणीसाठी आवश्यक भांडवल उपलब्ध नसल्याची व्यथा शेतकऱ्यांनी मांडली आहे. एकीकडे वाढते उत्पादन खर्च, दुसरीकडे नैसर्गिक आपत्ती आणि त्यातच कर्जाचा वाढता बोजा यामुळे बळीराजा आर्थिक विवंचनेत सापडला आहे.

निवेदनात महसूल विभागाने तातडीने नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करून पंचनामे करावेत, संबंधित गावांना अतिवृष्टीग्रस्त घोषित करावे, पीकविमा योजनेंतर्गत नुकसानभरपाई लवकरात लवकर मंजूर करावी तसेच दुबार पेरणीसाठी बियाणे आणि आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, या निवेदनावर ४० हून अधिक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, निवेदनाची प्रत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनाही देण्यात आली आहे. लिंगदेव, कोतूळ आणि ब्राह्मणवाडा महसूल मंडळातील शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळावा, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी शिवसेना (ठाकरे गट) उपतालुका प्रमुख प्रभाकर फापाळे यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, वेळेत पंचनामे झाले नाहीत आणि नुकसानभरपाई जाहीर झाली नाही, तर शेतकऱ्यांच्या न्यायासाठी तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीकडे शासनाने संवेदनशीलतेने पाहून तातडीने मदत करावी.

तहसीलदार, अकोले यांना निवेदन देताना शिवसेना (ठाकरे गट) उपतालुका प्रमुख प्रभाकर फापाळे, माधवराव तिटमे, विठ्ठल कानवडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष हरिभाऊ फापाळे, बाबुराव कोरडे, सागर फापाळे यांच्यासह लिंगदेव परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. आता महसूल प्रशासन आणि राज्य शासन या मागणीवर कितपत तातडीने कार्यवाही करते, याकडे संपूर्ण अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

श्री. हरिभाऊ मंजुळ फापाळे

# गोवर्धन खेडकर वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानित

पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील भालगाव येथील आधुनिक शेती करणारे शेतकरी गोवर्धन प्रल्हाद खेडकर यांना महाराष्ट्र शासनाचा मुंबई येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम वरळी येथे कृषी दिनाचे औचित्य साधून वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांच्या हस्ते सपत्नीक प्रदान करण्यात आला.

गोवर्धन खेडकर हे प्रगतशील शेतकरी आहेत. गेल्या दहा वर्षापासून ते शेतीत वेगवेगळे प्रयोग करतात. यामध्ये त्यांनी बटाट्याचे एकरी १४ टन उत्पन्न काढले. तुर व मुगाचे एकरी २१ क्विंटल एवढे विक्रमी उत्पादन काढले होते. कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल महाराष्ट्र शासनाने कृषी सन २०२३-२४ सन्मान व पुरस्कार वितरण समारंभ २०२६ चे आयोजन केले होते. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी व अधिकारी यांच्या सन्मान सोहळ्यात शेतकरी गोवर्धन खेडकर यांना शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल खेडकर यांना भालगाव येथील पाणी फाउंडेशन फार्मर कप स्पर्धेतील मैत्री शेतकरी गट व झुंजार महिला शेतकरी गट तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाथर्डी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



# आदिवासी मुलांच्या आरोग्याशी क्रूर खेळ खेळणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी

पुणे/प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)

जुन्नर ,आंबेगाव,खेड तालुक्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना स्त्री शक्ती सेंट्रल किचन (कोटम दारा)यांच्या मार्फत जेवण पुरविण्याचे कॉंट्राक्ट शासनाकडून देण्यात आले होते.दि.३० सप्टेंबर रोजी सकाळी १०.४५ वाजता सोमटवाडी येथील शासकीय कन्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण घेवून स्त्री शक्ती सेंट्रल किचन गाडी आली होती. जेवणाची तपासणी केली असता राजमा भाजी मध्ये अळ्या आढळून आल्या.शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका कल्पना गर्जे, अधीक्षक हरीश गायकवाड आणि सेंट्रल किचन च्या प्रतिनिधी सुषमा बाळसरफ यांच्या समक्ष जेवणाची तत्काळ पंचनामा करून हे विषारी पदार्थ मुलींना वाढण्यास नकार दिला.

घटनेच्या दुसऱ्या दिवशी १ ऑक्टोबर २०२५ रोजी सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रियांका घनवट, सोनल काकडे यांनी सेंट्रल किचन तपासणी करून भाजीत अळ्या नसून राजमाचे अंकुर होते असा अहवाल घोडेगाव प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांस सादर केला.याच अहवालाचा आधार घेवून प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी भाजीत अळ्याचं नव्हत्या असा क्लीन चिट देणार अहवाल अप्पर आयुक्त ठाणे यांना पाठवला.

सामाजिक कार्यकर्ते आणि सुकाळवेडे गावचे सरपंच दत्ता गवारी यांची माहिती अधिकाराचा पाठपुरावा करून सदर बाब उघडकीस आणली.ती अशी,३० सप्टेंबर आणि २ ऑक्टोबर २०२५ रोजी एकाच वेळी जुन्नर ,आंबेगाव, खेड तालुक्यातील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील मुख्याध्यापकांनी राजम्याच्या भाजीत अळ्या सापडल्याचा





लेखी अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला आहे .तसेच डहाणू प्रकल्प अधिकारी विशाल खत्री (भा.प्रे.स )यांनी १० ऑक्टोबर २०२५ रोजी अप्पर आयुक्त ठाणे यांस स्वतः चा स्वयस्पष्ट अहवाल साधार केला.ह्या अहवालात त्यांनी जेवणात अळ्या असल्याचा धक्कादायक बाबीला अधिकृत पुष्टी दिली.आणि भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पडले आहे .

गोर गरीब आदिवासी मुला मुलींच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आणि चुकीचा अहवाल सादर करून शासनाची आणि समाजाची दिशाभूल करणाऱ्या घोडेगाव प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई ,मुख्याध्यापिका कल्पना गर्जे अधीक्षक हरीश गायकवाड आणि सेंट्रल किचन च्या संचालकावर अजा/अज (अत्याचार प्रतिबंध) १९८९र आणि शासकीय पुरावे नष्ट केल्याप्रकरणी करावा अशी मागणी केलेली आहे.तसेच पोलिसांनी देखील या प्रकाराकडे नकळत पणे डोळेझाक केलेली आहे. गुन्हा दाखल करण्यास गेलेल्या सरपंच आणि ग्रामस्थांना खोटे सांगण्यात आले की गुन्हा दाखल करायचा असेल तर वरिष्ठ कार्यालयाचची परवानगी घ्यावी लागते असे सांगून हा जिवघेना प्रकार दाबण्याचा प्रयत्न केला आहे आणि चौकशी दरम्यान विद्यार्थी आणि शिक्षकाचे जबाब नोंदविले आहेत जुन्नर तालुक्यातील उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक यांचा सुद्धा हात आहे का,असा संशय व्यक्त केला जात आहे .पोलिसानी फक्त सोमत वाडी शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकाचे जवाब नोंदविले आहेत.

परंतू तक्रारी मध्ये सेंट्रल किचन चे पुरावे नष्ट केले आहेत.याबाबत चा पुरावा म्हणून सीसीटीव्ही फुटेज मागितले.पोलिसानी ते जप्त करायला पाहिजे होते. परंतु पोलिसांनी फक्त पत्र व्यवहार करून तक्रारदाराच्या डोक्यात धूळ टाकण्याचे काम केल आहे.आणि सेंट्रल किचन ला वाचविण्याचे सर्व प्रशासकीय यंत्रणा आणि पोलीस यंत्रणा करत आहे की काय असा संशय आदिवासीं समाजात व्यक्त केला जात आहे .

आता मुख्यमंत्री आणि संबधित मंत्रालय या दोषी भ्रष्ट आणि आदिवासी मुलांच्या जीवावर उठलेल्या अधिकाऱ्यांचे निलंबन करून त्याना जेलची हवा दाखवणार का? या कडे संपूर्ण महाराष्टाचे लक्ष लागले आहे

# श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा; कुकडी प्रकल्पाच्या ओव्हरफ्लोचे रोटेशन सोडण्याचे आदेश



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी कुकडी प्रकल्पाच्या ओव्हरफ्लोचे रोटेशन तातडीने सोडण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला दिले आहेत. यासोबतच विसापूर धरण पूर्ण क्षमतेने भरून घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.



श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रमदादा पाचपुते यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नासंदर्भात सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांनी जलसंपदा विभागाकडे वारंवार मागणी लावून धरली होती. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाल्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

या निर्णयामुळे श्रीगोंदा तालुक्यातील सिंचन व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार असून शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. परिणामी खरीप हंगामातील पिकांना आवश्यक पाणी मिळून उत्पादनवाढीस चालना मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, कुकडी प्रकल्पाच्या ओव्हरफ्लोचे रोटेशन सुरू करण्याच्या निर्णयाबद्दल जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार विक्रमदादा पाचपुते यांचे श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी बांधवांनी आभार व्यक्त केले आहेत.

# शिर्डीत अखिल महाराष्ट्र वैदु समाज विकास फाउंडेशनची राज्यस्तरीय बैठक उत्साहात संपन्न; नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार!

**शिर्डी (समर्थ गांवकरी)**







शिर्डी येथे अखिल महाराष्ट्र वैदु समाज विकास फाउंडेशनची राज्यस्तरीय बैठक मुख्य मार्गदर्शक श्री. दशरथ हाटकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राज्यभरातील पदाधिकारी, समाजबांधव आणि मान्यवरांच्या उपस्थितीत समाजाच्या विकासासाठी विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

या बैठकीत नवनिर्वाचित महाराष्ट्र अध्यक्ष श्री. स्वामी शिरकूल, महाराष्ट्र उपाध्यक्ष श्री. संतोष शिंदे, श्री. रोहित शिंदे, श्री. लक्ष्मण (लक्की) दासरजोगी, श्री. रामनाथ धनगर यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी श्री. दशरथ साहेबराव पवार यांना नाशिक जिल्हा सेकंडरी टीचर्स सोसायटीच्या वतीने प्राप्त झालेल्या 'आदर्श शिक्षकेतर पुरस्कार' मिळाल्याबद्दल विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छांचा वर्षाव केला.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना मुख्य मार्गदर्शक श्री. दशरथ हाटकर यांनी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एकजूट अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. समाजातील युवक, महिला आणि सर्व घटकांना सोबत घेऊन शैक्षणिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच फाउंडेशनचा वर्धापन दिन सर्वांनी एकत्रितपणे मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे आवाहनही त्यांनी केले. नवनिर्वाचित महाराष्ट्र अध्यक्ष श्री. स्वामी शिरकूल यांनी आपल्या मनोगतात समाजाप्रती असलेली बांधिलकी व्यक्त करत, समाजाच्या विकासासाठी, संघटन बळकट करण्यासाठी आणि प्रत्येक घटकापर्यंत फाउंडेशनचे कार्य पोहोचविण्यासाठी मी सदैव कार्यरत राहीन, अशी ग्वाही दिली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून फाउंडेशनचे मार्गदर्शक श्री. राजू वैदु, माजी अध्यक्ष श्री. शामलिग शिंदे, श्री. साहेबराव सवारी पवार, श्री. राजू लोखंडे, महिला अध्यक्षा सौ. अंकुशाताई शिंदे, कार्याध्यक्ष श्री. नारायण शिंदे, समन्वयक श्री. ताया लोखंडे, माजी सचिव श्री. प्रकाश वैदु, नाशिक जिल्हाध्यक्ष श्री. अशोक जाधव, युवा कार्याध्यक्ष श्री. अनिल सुरेश पवार, माजी नगरसेविका सौ. चंदाताई लोखंडे, सौ. शोभा हाटकर, सौ. अमृता शिंदे, भावड्या धनगर यांच्यासह राज्यातील विविध भागांतून आलेले समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीचा समारोप समाजाच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

# डॉ. सलीम निसार शेख यांना इंग्रजी विषयात पीएच.डी.; भयपट साहित्याच्या आंतरमाध्यमीय रूपांतरावर संशोधन!

**अकोले (समर्थ गांवकरी)**



अकोले येथील अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाचे इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सलीम निसार शेख यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. भयपट साहित्य, चित्रपट, मालिका आणि लघुपट यांच्या आंतरमाध्यमीय रूपांतरांचा सखोल अभ्यास करणाऱ्या त्यांच्या संशोधनाला ही प्रतिष्ठेची पदवी बहाल करण्यात आली.

'निवडक कलाकृतींच्या आंतर–माध्यमीय रूपांतराच्या संदर्भात भय–तत्त्वाचे रचनाविषयक अन्वेषण' या विषयावरील त्यांच्या संशोधन प्रबंधात साहित्य आणि दृक–श्राव्य माध्यमांतील भय–तत्त्वाच्या अभिव्यक्तीचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. मानवी मनातील 'भीती' ही सार्वत्रिक भावना साहित्यापासून चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका आणि लघुपटांपर्यंत प्रवास करताना कशा प्रकारे बदलते, तिची मांडणी कशी विकसित होते आणि विविध माध्यमांमध्ये तिचे स्वरूप कसे रूपांतरित होते, याचे विश्लेषण या संशोधनातून करण्यात आले आहे.

डॉ. शेख यांनी जगातील सात गाजलेल्या भयपट साहित्यकृतींचा निवडक अभ्यास करून त्यांच्या मुद्रित स्वरूपाची आणि त्यावर आधारित दृक–श्राव्य रूपांतरांची तुलनात्मक चिकित्सा केली आहे. या संशोधनामुळे साहित्य आणि चित्रपट अभ्यास क्षेत्रात आंतरमाध्यमीय रूपांतरांच्या अभ्यासाला नवी दिशा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

डॉ. सलीम निसार शेख यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षणक्षेत्रातील मान्यवर तसेच अकोले तालुक्यातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# जुन्नर, आळेफाटा, नारायणगाव, माळशेज घाट मार्गे येणाऱ्या वारकऱ्यांनी त्याच ठिकाणी सुरक्षित थांबा



**शिवनेरी (समर्थ गांवकरी)**

जुन्नर , मंचर , खेड , चाकण , आळंदी व परिसरात पावसाचा जोर सातत्याने वाढत असल्यामुळे जुन्नर , आळेफाटा , नारायणगाव, माळशेज घाट मार्गे येणाऱ्या सर्व पायी दिंडी सोहळ्यातील वारकरी व भाविकांनी आहेत्या ठिकाणी सुरक्षित थांबा , असे नम्र आव्हान श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी देवाची यांनी पत्रकादरे सांगितले आहे .

या पत्रकात असे म्हटले आहे की , सर्व वारकरी भाविक व नागरिकांना नम्र आवाहन करण्यात येते की इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून आळंदी शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पुल पाण्याखाली गेले आहेत . त्यामुळे सध्या आळंदी शहरात येणे सुरक्षित नाही.

ज्या वारकरी व भाविकांनी आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला , त्यांनी त्या ठिकाणी आहात त्या ठिकाणीच सुरक्षित थांबावे आळंदी मध्ये येण्याचा प्रयत्न करू नये .

प्रशासन पोलीस यंत्रणा व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनेचे काटेकोरपणे पालन करा , तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये . नदीपात्र , घाट परिसर व बंद करण्यात आलेल्या पुलाकडे जाणे टाळावे .

वारकरी व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन आवश्यक ती सर्व उपयोजना करीत आहे . सर्वांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करा , असे नम्र आव्हान श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदी देवाची यांनी केले आहे.

शिवनेरी वार्ताहर : राजेश नागुजी डोके . फोटो पाठविला.

# कुलगुरूंच्या सकारात्मक भूमिकेने विद्यार्थ्यांना मिळाला न्याय

**वसमत (समर्थ गांवकरी)**

**हजारो विद्यार्थ्यांचे यश**

वसमत: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित मॉडर्न कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी सुमेर सिद्दिकी यांनी बॅकलॉग विषयाचा परीक्षा अर्ज भरल्यानंतर त्यांना कोरे (इश्ररपज्ञ) हॉलतिकीट देण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला होता. या संदर्भात विद्यार्थ्याने थेट विद्यापीठाचे कुलगुरू यांची भेट घेऊन संबंधित बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

दरम्यान, विद्यापीठाने नवीन अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्याबाबत महाविद्यालयांना निर्देश दिले होते. मात्र, जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना त्याच अभ्यासक्रमानुसार परीक्षा देण्याची संधी उपलब्ध होणे आवश्यक असल्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत होती.

याच पार्श्वभूमीवर विद्यार्थी सुमेर सिद्दिकी व त्यांचे सहकारी विद्यापीठाचे माझी विफयर्थी करण बोबडे, पत्रकार नवीद अहेमद,ऐडोकेट सिद्दिकी, पत्रकार फारूकी यांनी विद्यार्थ्याच्या हितासाठी कुलगुरूंनची भेट घेऊन चर्चा केली व निवेदन सादर करून जुन्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. त्यावेळी कुलगुरूंनी ही समस्या केवळ एका विद्यार्थ्यापुरती मर्यादित नसून, अशाच परिस्थितीतील हजारो विद्यार्थी असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून योग्य निर्णय घेण्याची भूमिका व्यक्त केली होती.

विद्यार्थ्यांच्या हितासाठी पत्रकारांची मागणीची दखल घेत कुलगुरूंनी संबंधित मंडळाकडे प्रस्ताव सादर केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देत जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा मार्ग मोकळा झाला.

या निर्णयामुळे सुमेर सिद्दिकी यांच्यासह हजारो विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध झाली. या सुवर्णसंधीचा लाभ घेत अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे.

या निर्णयानंतर सुमेर सिद्दिकी, त्यांचे वडील रिटायर पीएसआय मुसलोहोद्दीन सिद्दिकी तसेच त्यांचे सहकारी पत्रकार नवीद अहेमद करण बोबडे,ऐडोकेट सिद्दिकी, पत्रकार फारुकी यांनी कुलगुरू, उपकुलगुरू तसेच परीक्षा मंडळाची प्रत्यक्ष भेट घेऊन शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांनी विद्यापीठ प्रशासनाचे विशेष आभार मानले.



या निर्णयामुळे सुमेर सिद्दिकी यांच्यासह हजारो विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध झाली. या सुवर्णसंधीचा लाभ घेत अनेक विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देत घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचले, तसेच पुढील उच्च शिक्षण आणि करिअरच्या संधी खुल्या झाल्या. विद्यार्थीहित जपणारी कुलगुरूंची ही भूमिका विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मोलाची ठरल्याची भावना विद्यार्थी व पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

# केंद्रप्रमुख म्हणून निवड झालेल्या पिंपळगाव निपाणीच्या भूमिपुत्रांचा संटुआई देवस्थानात गौरव!

**गणोरे (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील कोट्यवधी भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या संटुआई देवस्थान मंदिरात नुकत्याच खइझड मार्फत झालेल्या केंद्रप्रमुख निवड प्रक्रियेत यश संपादन करून केंद्रप्रमुख म्हणून निवड झालेल्या पिंपळगाव निपाणीच्या भूमिपुत्रांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. आई संटुआई प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात श्री. प्रमोद वाकचौरे, श्री. सुयोग वाकचौरे आणि श्री. सतीश वाकचौरे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. उमाजी उघडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. जालिंदर वाकचौरे तसेच संगमनेर सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री. मदन आंबरे उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सन्मानित केंद्रप्रमुखांचे अभिनंदन करत त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील युवकांना स्पर्धा परीक्षांची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी लालूशेठ दळवी, दादापाटील गोरडे, जालिंदर वाकचौरे, देवराम वाकचौरे, गणपत वाकचौरे, रावसाहेब तोरमल, बाळासाहेब वाकचौरे, संदीप वाकचौरे, डॉ. विजय गोरडे, सचिन गोरडे, दौलत महाले यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी बुद्रुक येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने वृक्षारोपण करून निसर्ग रक्षणाचा संकल्प केला.

केंद्रस्तर विशेष शिक्षक भानुदास शिंदे यांच्या संकल्पनेतून तसेच विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र खेडकर आणि उपप्राचार्य बापूसाहेब दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणातील महत्त्व, त्यांचे संवर्धन आणि भविष्यातील गरज याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

मार्गदर्शन करताना भानुदास शिंदे म्हणाले, वृक्ष हे मानवाचे खरे मित्र आहेत. शुद्ध हवा, सावली, फळे आणि फुलांची अमूल्य देणगी आपल्याला वृक्षांकडून मिळते.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/२८/२०२६ अकोले दि. १७/०६/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. मुरलीधर परशराम हासे, रा. म्हाळादेवी**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आई कै. विठाबाई परशराम हासे यांचा मृत्यू दि. २०/०८/२०२४** रोजी **मौजे म्हाळादेवी** येथे झाला असुन त्यांच्या **वडीलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय म्हाळादेवी**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. मुरलीधर परशराम हासे, रा. म्हाळादेवी**, ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांची आई कै. विठाबाई परशराम हासे यांचा मृत्यू दि. २०/०८/२०२४** रोजी **मौजे म्हाळादेवी** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय म्हाळादेवी**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/०६/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# जामिनावर सुटताच बेकायदेशीर रॅली; अहिल्यानगरमध्ये सराईत गुन्हेगार जेरबंद

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जेलमधून जामिनावर सुटल्यानंतर बेकायदेशीररीत्या विनापरवाना रॅली काढून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या व सोशल मीडियावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला जेरबंद एमआयडीसी पोलिसांनी जेरबंद केले. भोऱ्या उर्फ विठ्ठल नवनाथ काळे (वय १९, रा. बोल्हेगाव फाटा, ता. जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

आरोपी भोऱ्या हा खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी यांसारख्या गंभीर गुन्ह्या मधील प्रमुख आरोपी असून, ४ जुलै २०२६ रोजी त्याची जिल्हा कारागृहातून न्यायालयाने जामिनावर सुटका केली होती. जेलमधून सुटताच आरोपी भोऱ्या आणि त्याच्या १० ते १५ साथीदारांनी बेकायदेशीर जमाव जमवला. त्यांनी सबजेल कारागृहापासून ते नागापूर एमआयडीसी भागापर्यंत मोटारसायकलवर स्वार होऊन मोठमोठ्याने आरडाओरडा करत, घोषणाबाजी करत विनापरवाना रॅली काढली. या बेकायदेशीर रॅलीचा व्हिडिओ आणि ऑडिओ तयार करून तो सोशल मीडियावर प्रसारित करण्यात केला. या प्रकाराची गंभीर दखल घेत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आरोपी भोऱ्यासह धीरज उर्फ जॉकी जॉन आवारे, सुजल उर्फ गोट्या भाकरे, चेतन उर्फ भैय्या संतोष सरोदे, यश शिरसाठ, निकेश विश्वास कळकुंबे, गणेश विठ्ठल काळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यातील मुख्य आरोपीला तत्काळ अटक करण्यात आली आहे. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात, सहायक फौजदार राकेश खेडकर, पोलिस अंमलदार राजू सुद्रिक, शैलेश रोहोकले, संदीप पवार, गणेश चौधरी, किशोर जाधव यांच्या पथकाने केली.



# थोडक्यात पण महत्वाचे



## भक्तिभावाच्या वातावरणात भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सवाचे आयोजन

■ श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे भाविकांना उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : आषाढ शुद्ध द्वितीयेचे औचित्य साधत श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सव गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. शहरातील लालटाकी रोड येथील श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट येथून भगवान श्री जगदीश यांच्या रथयात्रेला प्रारंभ होणार असून, आकर्षक सजविलेल्या रथात विराजमान भगवान श्री जगदीशांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. भजन, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात ही रथयात्रा संपन्न होणार आहे.या पवित्र सोहळ्याचे यजमान श्री सत्यनारायणजी गोवर्धनजी झंवर हे असून, श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे अध्यक्ष तथा विश्वस्त दीपक काबरा यांनी सर्व समाजबांधव, नागरिक आणि भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून भगवान श्री जगदीश यांचे दर्शन घ्यावे व रथयात्रा महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे. आषाढ महिन्यातील या पवित्र धार्मिक सोहळ्यामुळे परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघणार असून, भगवान श्री जगदीश यांच्या कृपाशीर्वादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## दुय्यम कारागृह अखेर राज्य शासनाच्या आदेशानुसार कायमस्वरूपी बंद



जामखेड (स. गांवकरी) : जामखेड तालुक्यातील न्यायालयीन कोठडीसाठी वापरण्यात येणारे दुय्यम कारागृह अखेर राज्य शासनाच्या आदेशानुसार कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहे. या कारागृहातील ६२ आरोपींना बुधवारी (दि. ९ जुलै) कडेकोट पोलीस बंदोबस्तात नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात हलविण्यात आले. यापुढे जामखेड येथील न्यायालयीन कोठडीतील कैद्यांचा मुक्काम नाशिक मध्यवर्ती कारागृहातच होणार आहे. राज्य शासनाने सुरक्षेच्या दृष्टीने तसेच जीर्ण अवस्थेतील कारागृहांचा विचार करून महाराष्ट्रातील सर्व ११६ दुय्यम कारागृहे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक ठिकाणी कारागृहांची इमारत जीर्ण झाल्याने तसेच कैदी पळून जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या कारागृहांतील सर्व कैद्यांना जवळच्या जिल्हा किंवा मध्यवर्ती कारागृहात टप्प्याटप्प्याने स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. याच निर्णयाची अंमलबजावणी करत जामखेड येथील दुय्यम कारागृहातील एकूण ६२ आरोपींना ९ जुलै रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास पोलिस वाहनांच्या ताफ्यातून नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवाना करण्यात आले. या आरोपींमध्ये ५९ पुरुष आणि ३ महिला आरोपींचा समावेश होता.स्थलांतराच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी जामखेड कारागृह परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. संपूर्ण प्रक्रिया अत्यंत शांततेत, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. आरोपींना नाशिककडे रवाना करताना त्यांच्या नातेवाईकांनी कारागृहाबाहेर उपस्थित राहून निरोप दिला. या वेळी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळल्याचे भावनिक चित्र पाहायला मिळाले.

## शिळगाव स्मशानभूमी मार्गावरील पाणी समस्येवर कारवाई होणार

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभागातील शिळगाव स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बेकायदेशीर भराव टाकण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने अंत्यविधीला जाणाऱ्या नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येची गंभीर दखल घेत प्रशासनाने पुढील दोन ते तीन दिवसांत रस्ता व गटार बांधकामाचे काम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रसंगी काही शेतकऱ्यांकडून कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र सार्वजनिक हिताचे हे काम कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करण्यात येईल. जर कोणी कामात अडथळा निर्माण केला तर संबंधितांवर प्रशासनाकडून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. सदर प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी स्थानिक नगरसेवक बाबाजी पाटील आणि नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांनी पुढाकार घेतला असून सदर ठिकाणी सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांच्यासह संबंधित अधिकारी व अभियंता उपस्थित राहून परिस्थितीची पाहणी केली व आवश्यक सूचना दिल्या असल्यामुळे स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता आणि पाणी निचऱ्याची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राज्यातील हजारो शिक्षक सामूहिक रजेवर!

■ जिल्हाधिकारी कार्यालयांवर राज्यव्यापी मोर्चे

■ शिक्षणविरोधी धोरणांविरोधात महाराष्ट्रभर एल्गार!

■ शिक्षकांच्या एकजुटीची सरकारला घ्यावी लागली दखल



"शिक्षक संघटनांनी पुकारलेल्या आंदोलनाला राज्यभर मोठा प्रतिसाद मिळाला. शिक्षकांमध्ये केवढी मोठी खदखद आहे हे या कृतीतून शिक्षकांनी दाखवून दिले आहे. शिक्षक संघटनांच्या आंदोलनाला विद्यार्थी, पालक आणि सामाजिक संघटनांनी तसेच शिक्षक आणि पदवीधर आमदार यांनी पाठींबा दिला. आता शासन निर्णयांची प्रतीक्षा आहे."

**- राजेश सुर्वे, समन्वयक, प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समिती.**

“शिक्षकांचे स्थान वर्गात आहे, रस्त्यावर नाही. मात्र शासनाच्या शिक्षणविरोधी धोरणांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या रक्षणासाठी शिक्षकांना सामूहिक रजा घेऊन रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागले, ही दुर्दैवी बाब आहे. शिक्षणमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे. आता आश्वासनांचे तातडीने ठोस शासन निर्णयांमध्ये रूपांतर करून शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करावे, हीच राज्यातील लाखो विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांची अपेक्षा आहे.”

**- विजय कोंबे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती.**

मुंबई : (स. गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला दुय्यम स्थान देणारी धोरणे, एसआयआरच्या नावाखाली शिक्षण क्षेत्रात महसूल विभागाचा वाढता हस्तक्षेप, बीएलओसह शिक्षकांवर सातत्याने लादली जाणारी अशैक्षणिक कामे, टीईटीसंदर्भातील प्रलंबित प्रश्न, नवीन संचमान्यता, पदोन्नतीतील अन्याय आणि शिक्षकांवरील वाढता प्रशासकीय जाच यांच्या निषेधार्थ आज महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी सामूहिक रजा घेऊन राज्यभर अभूतपूर्व आंदोलन छेडले. जिल्हा स्तरावरील निदर्शने असोत किंवा मुंबईच्या आझाद मैदानावरील धरणे आंदोलन, राज्यभर शिक्षकांच्या एकजुटीचा बुलंद आवाज घुमला. अखेर या तीव्र आंदोलनाची शासनाला दखल घ्यावी लागली.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शिक्षक आमदार व विविध शिक्षक संघटनांच्या शिष्टमंडळासोबत सविस्तर चर्चा केली. या बैठकीला शिक्षक आमदार विक्रम काळे, डॉ. जयंत आसगावकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीकांत देशपांडे आणि किशोर दराडे यांच्यासह शिक्षक संघटनांच्या शिष्टमंडळात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघांचे (पाटील गट) राज्य अध्यक्ष केशव जाधव, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, राज्य पदवीधर शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष मनोज मराठे, शिक्षक समितीचे राज्य कार्यालयीन चिटणीस किशोर मधुकर पाटील, शिक्षक भारतीचे सुभाष मोरे आणि ज्येष्ठ शिक्षक नेते अशोक बेलसरे यांचा समावेश होता.

चर्चेदरम्यान टीईटी, बीएलओ (SIR) काम, नवीन संचमान्यता, पदोन्नती, पदवीधर शिक्षक पदांसह विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. सन २०१३ पूर्वी सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना टीईटीमधून सूट देण्याबाबत शासनाची भूमिका सकारात्मक असल्याचे चर्चेत स्पष्ट झाले. एसआयआर आणि बीएलओ कामाच्या निमित्ताने शिक्षकांचा होणारा अपमान, दबाव आणि अन्यायकारक कारवाई थांबविण्यासाठी महसूल विभागासोबत तातडीने बैठक घेण्याचे शिक्षणमंत्र्यांनी सांगितले. याशिवाय नवीन संचमान्यता धोरणात आवश्यक बदल, जिल्हा परिषद शाळांमधील १०० व त्यापेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या शाळांना मुख्याध्यापक पद, सहावी ते आठवी शिकविणाऱ्या पात्र शिक्षकांना पदवीधर शिक्षक पदाचा लाभ आणि पदोन्नती प्रक्रियेत सेवाज्येष्ठतेचा योग्य विचार करण्याबाबतही मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका मांडली.

पुढील आठवड्यात मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी शिक्षण विभाग, महसूल विभाग आणि शिक्षक संघटनांच्या प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेऊन शिक्षण व शिक्षकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी दिले. आजचे आंदोलन हे केवळ काही मागण्यांसाठीचे निदर्शन नव्हते, तर शिक्षण व्यवस्थेच्या सन्मानासाठी आणि शिक्षकांच्या स्वाभिमानासाठी दिलेला ठाम इशारा होता. शिक्षकांना शिक्षणापासून दूर नेणाऱ्या अशैक्षणिक जबाबदाऱ्या, सातत्याने वाढणारा प्रशासकीय हस्तक्षेप आणि निर्णय प्रक्रियेतील अन्याय याविरोधात राज्यभरातील शिक्षकांनी एकजुटीने उभे राहत शासनाला स्पष्ट संदेश दिला आहे की, शिक्षणविरोधी धोरणे यापुढे सहन केली जाणार नाहीत. राज्यभर झालेल्या या अभूतपूर्व आंदोलनामुळे शासनाला शिक्षकांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागले आहे. मात्र, केवळ आश्वासनांनी शिक्षकांची फसवणूक होणार नाही. बैठकीतील सकारात्मक चर्चा आणि दिलेली आश्वासने यांचे तातडीने शासन निर्णयांमध्ये रूपांतर होऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली, तरच या चर्चेला खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. अन्यथा राज्यातील शिक्षकांचा संघर्ष अधिक व्यापक आणि तीव्र करण्याचा निर्धार शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

## “गोमाता” पतसंस्थेला नवी दिल्लीत राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान

आळेफाटा : (स. गांवकरी)



दै. नवभारत / नवराष्ट्र वृत्तपत्र समूहातर्फे आयोजित "विकसित भारत लीडरशिप कॉन्क्लेव्ह २०२६ " मध्ये सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आळेफाटा परिसरातील प्रसिद्ध "गोमाता" पतसंस्थेला विशेष सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री मा. स्मृती इराणी आणि दै. नवभारत नवराष्ट्र वृत्तपत्र समूहाचे सर्वेसर्वा मा. महेशजी माहेश्वरी हे देखील व्यासपीठावर उपस्थित होते. "गोमाता" पतसंस्थेच्या प्रतिनिधींना मान्यवरांच्या शुभहस्ते विशेष सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. ग्रामीण भागातील ठेवीदार, शेतकरी आणि महिला बचत गटांना दिलेल्या आर्थिक बळकटीसाठी तसेच पारदर्शक कारभारासाठी संस्थेच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान देण्यात आला.

## वारी ही अंतर्मन जागवणारी यात्रा - पायी दिंडीचे स्वागत

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

वारी म्हटलं की डोळ्या समोर हजारो वारकऱ्यांचे अखंड चालणं उभे राहत, टाळ - मृदुंगांचा नाद आणि विठ्ठल नामाचा गजर होत असतो पंढरीची वारी ही महाराष्ट्राची शेकडो वर्षाची आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा आहे. वारी म्हणजे विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ असते. ही केवळ धार्मिक यात्रा नसते तर वारकऱ्यांना वर्षभर जगवण्याची ऊर्जा, शिस्त आणि जीवन मूल्यांची प्रेरणा देणारा संस्कार असतो.वारी ही अंतर्मन जागवणारी यात्रा आहे. असे प्रतिपादन अहिल्यानगर मनपा चे महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.



जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील श्रीक्षेत्र कन्हेरे ते पंढरपूर या पायी पहिल्याच दिंडीचे आगमन अहिल्यानगर शहरात अर्बन बँक कॉलनीत झाले. जिव्हाळेश्वर महादेव रथाचे स्वागत सौ.गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिंडी चालक हभप माधव महाराज पाटील, माजी सभापती पाटील साहेब, भारत बाप्पू, नगरसेवक निखिल वारे, योगीराज गाडे,भैय्या गंधे माजी नगरसेविका संगीता खरमाळे, मनपाचे शहर अभियंता मनोज पारखे, वैशाली पारखे,संदीप यादव, प्रवीण डोक्रस,राहुल जोशी, अजय घोलप, विनय वाखुरे, सचिन गाडे,शुभांगी निंबाळकर,मान्यवर उपस्थित होते.

या पायी दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे हरिहरेश्वर महादेव व विठोबाची भेट या ठिकाणी होते.दिंडी चालक हभप माधव महाराज पाटील यांचा सन्मान आदिनाथ जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अभिजीत जोशी, प्रज्ञा जोशी, भार्गव जोशी व कॉलनीतील मान्यवर व्यक्ती उपस्थित होते. यावेळी दिंडीतील वारकऱ्यांनी भारुडाचा कार्यक्रम सादर केला. हभप अभिजीत जोशी म्हणाले आषाढी वारीही समता,भक्ती व सामाजिक ऐक्याचा उत्सव असतो. परमेश्वरावर अटळ श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचे प्रतीक म्हणजे ही वारी असते. वारीत कोणी मोठा किंवा लहान नसतो, पैशापेक्षा माणुसकीला जास्त महत्त्व असते.असे श्री. जोशी म्हणाले. यावर्षी 200 ते 250 वारकरी दिंडीत सहभागी झाले होते. या सर्वांना कॉलनीच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.शेवटी जोशी परिवाराच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

## स्काऊट चळवळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा आधारस्तंभ

■ उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुडे

■ महादजी शिंदे विद्यालयात तालुकानिहाय स्काऊट-गाईड युनिट नोंदणी कार्यशाळा उत्साहात

श्रीगोंदा : (स. गांवकरी)




शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा भारत स्काऊट्स अँड गाईड्स, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकानिहाय स्काऊट-गाईड युनिट नोंदणी कार्यशाळा महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, श्रीगोंदा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. तालुक्यातील स्काऊट-गाईड चळवळीला बळकटी देणे, शाळांमधील युनिट नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने स्काऊट-गाईड उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुडे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून शालेय पोषण आहार अधीक्षक सत्यजित मच्छिंद्र, जिल्हा सहाय्यक आयुक्त निळकंठ बोरुडे, प्राचार्य दिलीप भुजबळ तसेच जिल्हा संघटन आयुक्त अरुण पेशकार उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना उपशिक्षणाधिकारी मीना शिवमुंडे म्हणाल्या, "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. स्काऊट-गाईड ही विद्यार्थ्यांमध्ये सद्विचार, सद्वर्तन, शिस्त, साहस, नेतृत्वगुण आणि सेवाभाव विकसित करणारी जागतिक चळवळ असून प्रत्येक शाळेने या चळवळीला प्राधान्य द्यावे. स्काऊट हे देशाचे आधारस्तंभ आहेत."

यावेळी जिल्हा सहाय्यक आयुक्त तथा प्राचार्य दिलीप भुजबळ यांनी युनिट नोंदणी प्रक्रिया, विविध प्रशिक्षण कार्यक्रम, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील संधी तसेच विद्यार्थ्यांच्या नेतृत्व विकासात स्काऊट-गाईड चळवळीचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा संघटन आयुक्त अरुण पेशकार यांनी ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेतील तांत्रिक बाबी, आवश्यक कागदपत्रे आणि नियोजनाची माहिती दिली.

कार्यशाळेत जिल्हा स्काऊट कार्यालयाचे संजय शिंदे, विकास रत्नपारखे, विषयतज्ज्ञ जावेद अत्तार तसेच माजी विस्तार अधिकारी जमदाडे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन करत सहभागींच्या शंकांचे निरसन केले. या कार्यशाळेस तालुक्यातील स्काऊट मास्टर, गाईड कॅप्टन, कब मास्टर, फ्लॉक लीडर तसेच शिक्षक-शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. युनिट नोंदणीची ऑनलाइन प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, वार्षिक नियोजन, विविध उपक्रमांचे आयोजन आणि विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याबाबत प्रात्यक्षिकांसह सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास लोखंडे यांनी केले, तर सोमनाथ बारगळ यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, शिक्षक व सहभागींचे आभार मानले.

## भाजीपाला विक्री करणाऱ्या महिलेचे दागिने लुटणारे दोघे जेरबंद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर तालुक्यातील देहरे परिसरात भाजीपाला विक्री करून घरी परतणाऱ्या महिलेवर हल्ला करून तिचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन लुटणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेने तीन दिवसांत अटक केली आहे.या कारवाईत गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी व मोबाईल असा एकूण ४० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ४ जुलै रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महिला दुचाकीवरून भाजीपाला विक्री करून उरलेला भाजीपाला घेऊन घरी परतत होती. देहरे शिवारात दोघांनी तिच्या दुचाकीला लाथ मारून तिला अडविले. त्यानंतर बळजबरीने तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल फोन हिसकावून घेतला होता. यासंदर्भात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्यासह पोलीस अंमलदार विष्णू भागवत, दीपक घाटकर, शाहिद शेख, गणेश धोत्रे, फुरकान शेख, प्रशांत राठोड, ज्योती शिंदे यांचे पथक तयार करण्यात आले. पथकाने घटनास्थळी भेट देऊन माहिती संकलित केली तसेच तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला. तपासादरम्यान राहुल विजय निकम याने गुन्हा केल्याची आणि तो त्याच्या साथीदारासह निंबळक रेल्वे फाटकाजवळील धरमपुरी मंदिर परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे राहुल विजय निकम (वय २५, रा. वडगाव गुप्ता, ता. अहिल्यानगर) व अरूण रावसाहेब बर्डे (वय २१, रा. विळद, ता. अहिल्यानगर) अशी सांगितली.

## आषाढी वारीसाठी सोलापूर जिल्हा परिषद सज्ज

■ वारकऱ्यांच्या सुविधांमध्ये यंदा 'रेकॉर्डब्रेक' वाढ!

■ ५० हजार वारकऱ्याना मिळणार रेनकोट

सोलापूर : (स. गांवकरी)



आषाढी वारीसाठी सोलापूर जिल्हा परिषद सज्ज झाली आहे ; यावर्षी वारकऱ्यांच्या सुविधांमध्ये 'रेकॉर्डब्रेक' वाढ करण्यात आली असून ५० हजार वारकऱ्याना रेनकोट पुरविले जाणार आहेत.! फूट मसाजर पाच पटीने वाढविण्यात आले असून, स्नानगृहे सहा पटीने वाढवली आहेत; मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी ही माहिती दिली.

आषाढी एकादशी महासोहळ्यासाठी पंढरपूरकडे कूच करणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सोलापूर जिल्हा परिषद प्रशासन सज्ज झाले आहे. यंदाची वारी अधिक सुकर आणि हायटेक करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुविधांमध्ये दुप्पट ते पाच पटीने वाढ करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यंदा ग्रामविकास मंत्रालयामार्फत वारकऱ्यांसाठी तब्बल ५० हजार रेनकोटचे वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली. देहू आणि आळंदी येथून निघालेल्या पालख्यांच्या मार्गावर वारकऱ्यांसाठी जर्मन हँगर्स, पाण्याचे टँकर्स, स्वच्छतागृह आणि स्नानगृहांची उभारणी पूर्ण झाली असून, प्रशासकीय यंत्रणा २४ तास कार्यरत असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, वारकऱ्यांचा प्रवासातील थकवा दूर करण्यासाठी गेल्या वर्षी सुरू केलेल्या 'फूट मसाजर' सुविधेला मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे यंदा ही संख्या पाच पटीने वाढवण्यात आली आहे. तसेच महिला व पुरुष वारकऱ्यांच्या सोयीसाठी स्नानगृहांची संख्या तब्बल सहा पटीने वाढवण्यात आली आहे. इतर सर्व मूलभूत सुविधांमध्येही यंदा किमान दोन ते तीन पटीने वाढ करण्यात आली आहे.

## ज्येष्ठ वारकऱ्यांना 'जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराज जीवनगौरव पुरस्कार २०२६' प्रदान

■ विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचा उपक्रम

■ महापौर मंजूषा नागपुरे यांच्याहस्ते वारकऱ्यांचा सन्मान

■ 30 फूट विठ्ठल मूर्तीने वेधले लक्ष

पुणे : (स. गांवकरी)



संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यात दाखल झालेल्या वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ सेवेकरी, भजन-कीर्तन, संगीत, सामाजिक आणि संतसेवा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या वारकऱ्यांचा 'जगद्गुरु संत शिरोमणी तुकाराम महाराज जीवनगौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मान करण्यात आला. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यंदाच्या पुरस्काराचे मानकरी म्हणून सौ. सुलभा विजयकुमार दिवाण (भजनी गायिका), ह.भ.प. पांडुरंग दत्तात्रय गुजाका (भजनी गायक), ह.भ.प. हर्षल एकनाथ जाधव (मृदुंगमनी, संगीत विशारद), श्रीमती कांता साहेबराव लांडगे (भजनी गायिका), गणेश केशव गायकवाड (दत्त सेवक), श्रीमती शांताबाई पाटलोजी ढोरे (भजनी गायिका) आणि ह.भ.प. बाबासाहेब दत्तात्रय रानवडे (भजनी मंडळ) यांचा सन्मान करण्यात आला.

बोपोडी मेट्रो स्टेशनजवळील पालखी विसावा स्थळी पार पडलेल्या या कार्यक्रमाला महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर तथा समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर, आमदार सिद्धार्थ शिरोळे, नगरसेवक सनी निम्हण, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, नगरसेविका भक्ती गायकवाड, नगरसेविका सपना छाजेड, रिपाइं शिवाजीनगर अध्यक्ष अविनाश कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, रोटरी क्लब ऑफ पुना डाउनटाउन आणि संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहॅबिलिटेशन फिजिओथेरपी महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी मोफत मालिश व फिजिओथेरपी सेवा उपलब्ध करून देण्यात आली. शेकडो वारकऱ्यांनी या आरोग्य सेवेचा लाभ घेतला.

# माळशेज पट्ट्यात कोसळधार पावसाने बळीराजाचा घास हिरावला

## यंदाचा खरीप हंगाम उद्ध्वस्त ; ओतूर, डिंगोरे, खामुंडी परिसरातील शेकडो एकर शेती पाण्याखाली ; दुबार पेरणीचे संकट

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर, मढ,पिंपळगाव जोगा, डिंगोरे, उदापूर, खामुंडी तसेच माळशेज पट्ट्यातील सर्वच गावांच्या शेत शिवारात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने बळीराजाच्या आशांवर अक्षरशः पाणी फेरले आहे.

पावसाचा जोर इतका प्रचंड आहे की, शेतजमिनींनी तलावाचे स्वरूप धारण केले असून, हिरवीगार उभी असलेली सोयाबीनसह विविध खरीप पिके पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम वाया जाण्याची भीती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे मोठे संकट कोसळले आहे.



आज सकाळी विविध ठिकाणांच्या टिपलेल्या दृश्यांमध्ये सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते. बहुतांश शेताच्या बांधांचा मागमूसही उरला नसून, पिके पाण्याखाली गाडली गेली आहेत. माळशेज पट्ट्यातील डोंगररांगांवर अजूनही ढगांचा मुक्काम कायम असल्याने पावसाचा जोर ओसरण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने शेतातील पाण्याचा निचरा होऊ शकलेला नाही.

आधीच अवकाळी पाऊस, वाढलेला उत्पादन खर्च, महागडी बियाणे, रासायनिक खते आणि औषधांमुळे आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप पेरणी केली होती. मात्र, निसर्गाच्या या तडाख्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. अनेक ठिकाणी सोयाबीनची रोपे पूर्णपणे पाण्यात बुडाली असून, दीर्घकाळ पाणी साचून राहिल्यास पिके कुजण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या मते, पुढील दोन-तीन दिवस पाऊस असाच सुरू राहिला तर संपूर्ण पिके नष्ट होऊन दुबार पेरणीशिवाय पर्याय उरणार नाही. मात्र, पुन्हा बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च करण्याची आर्थिक क्षमता अनेक शेतकऱ्यांकडे उरलेली नाही. त्यामुळे बळीराजा हवालदिल झाला असून शासनाकडे मदतीची अपेक्षा व्यक्त करत आहे.

सामाजिक कार्यकर्ते जालिंदर उकिरडे व कैलास बोडके यांनी प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. पिकविमा योजनेंतर्गतही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ दिलासा देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सततच्या पावसामुळे नदी-नाले धोकादायक पातळीवर वाहत असल्याने तहसील प्रशासनाने नागरिकांना विनाकारण नदी, ओढे आणि पूरग्रस्त भागात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. हवामान खात्यानेही पुढील काही काळ मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने प्रशासन सतर्क झाले आहे.

यंदाच्या खरीप हंगामावर निसर्गाने पुन्हा घाला घातल्याने माळशेज पट्ट्यातील शेतकरी हतबल झाला असून, शासनाच्या तातडीच्या मदतीकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### गटारांतील अडथळा ठरणाऱ्या विद्युत केबल तात्काळ हटवा : आदेश भगत

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरात काही ठिकाणी सार्वजनिक गटारांमधून टाकण्यात आलेल्या टोरंट पॉवरच्या विद्युत केबलमुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होत असल्यामुळे रस्त्यावर पाणी साचत असल्याचे निदर्शनास आले आहे परिणामी सदर गंभीर प्रश्न उपस्थित करत ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक ॲड. आदेश कमलाकर भगत यांनी टोरंट पॉवर लिमिटेडच्या व्यवस्थापकांना निवेदन सादर केले आहे. गटारांमधील सर्व विद्युत केबल तात्काळ हटवून पर्यायी सुरक्षित मार्गाने स्थलांतरित करण्याची त्यांनी मागणी केली आहे. दिवा शहरातील सार्वजनिक गटारे ही पावसाचे पाणी आणि सांडपाणी वाहून नेण्यासाठी तयार करण्यात आलेली सुविधा असून काही ठिकाणी गटारातून विद्युत केबल टाकल्यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होत आहे. परिणामी पावसाळ्यात रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असून नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तसेच अपघात, साथीच्या आजारांचा प्रसार आणि विद्युत सुरक्षेच्या धोक्यातही वाढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय, गटारांमध्ये टाकलेल्या केबलमुळे ठाणे पालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना गटारांची नियमित साफसफाई, गाळ उपसा आणि देखभाल करणे कठीण होत असल्याने पाणी तुंबण्याची समस्या अधिक गंभीर बनत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. या पार्श्वभूमीवर टोरंट पॉवरने संबंधित ठिकाणी पाहणी करून गटारांमधील सर्व विद्युत केबल तातडीने हटवाव्यात किंवा पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यास कोणताही अडथळा निर्माण होणार नाही अशा पर्यायी सुरक्षित मार्गाने त्यांचे स्थलांतर करावे, अशी मागणी ॲड. आदेश भगत यांनी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारची कामे करताना संबंधित प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेऊन तांत्रिक निकषांचे पालन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. प्रसंगी उपशाखाप्रमुख नितीन चव्हाण व रितेश मोरे तसेच शुभम सिंग आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा



- कुकडी प्रकल्पाच्या ओव्हरफ्लोचे रोटेशन सोडण्याचे आदेश

श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी कुकडी प्रकल्पाच्या ओव्हरफ्लोचे रोटेशन तातडीने सोडण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला दिले आहेत. यासोबतच विसापूर धरण पूर्ण क्षमतेने भरून घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. श्रीगोंदा तालुक्याचे आमदार विक्रमदादा पाचपुते यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नासंदर्भात सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांनी जलसंपदा विभागाकडे वारंवार मागणी लावून धरली होती. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाल्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. या निर्णयामुळे श्रीगोंदा तालुक्यातील सिंचन व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार असून शेतीसाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. परिणामी खरीप हंगामातील पिकांना आवश्यक पाणी मिळून उत्पादनवाढीस चालना मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, कुकडी प्रकल्पाच्या ओव्हरफ्लोचे रोटेशन सुरू करण्याच्या निर्णयाबद्दल जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार विक्रमदादा पाचपुते यांचे श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी बांधवांनी आभार व्यक्त केले आहेत.

### नगर शहरात पोलिसांशी धक्काबुक्की करत सरकारी कामात अडथळा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्याच्या तपासासाठी वैदुवाडी (सावेडी) येथे घरझडती घेण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकाला महिलांच्या गटाकडून विरोध करण्यात आला. पोलिसांशी धक्काबुक्की व झटापट करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी सहा ते सात महिलांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महिला पोलीस अंमलदार छाया गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तोफखाना पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल आहे.

# लैंगिक अत्याचार; चुलत भावाला अभोणा पोलिसांकडून अटक

- कळवणमध्ये अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषणाचा धक्कादायक प्रकार
- आरोपी बाल न्यायालयात हजर

कनाशी : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील जामशेत येथील अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेला छेद देणारी धक्कादायक घटना कळवण तालुक्यात घडली आहे. नात्यातीलच 18 वर्षीय तरुणाने 14 वर्षीय अल्पवयीन मुलीचा विश्वासघात करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी अभोणा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 64(2)f, 65(1) तसेच पोक्सो कायदा कलम 4, 6 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि पीडिता हे नात्याने चुलत भाऊ-बहीण आहेत. ऑक्टोबर 2025 मध्ये आरोपीने घरात एकटेपणाचा फायदा घेऊन पीडितेवर अत्याचार केला. त्यामुळे पीडिता गरोदर राहिली. दि. 19 जून रोजी पीडितेला प्रसूतीसाठी नाशिक येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर पीडितेच्या नातेवाईकांनी अभोणा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. गुन्हा दाखल होताच अभोणा पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याची निरीक्षणगृहात रवानगी करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेने कळवण तालुक्यात संताप व्यक्त होत आहे. अल्पवयीन मुलांवरील अत्याचार रोखण्यासाठी समाज आणि यंत्रणांनी अधिक दक्ष राहण्याची गरज असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी बुद्रुक येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने वृक्षारोपण करून निसर्ग रक्षणाचा संकल्प केला.



केंद्रस्तर विशेष शिक्षक भानुदास शिंदे यांच्या संकल्पनेतून तसेच विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र खेडकर आणि उपप्राचार्य बापूसाहेब दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणातील महत्त्व, त्यांचे संवर्धन आणि भविष्यातील गरज याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शन करताना भानुदास शिंदे म्हणाले, "वृक्ष हे मानवाचे खरे मित्र आहेत. शुद्ध हवा, सावली, फळे आणि फुलांची अमूल्य देणगी आपल्याला वृक्षांकडून मिळते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे ही आजच्या काळाची गरज आहे." दिव्यांग विद्यार्थ्यांनी उत्साहाने वृक्षारोपण करत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांनी लावलेली रोपे भविष्यात मोठ्या वृक्षांचे रूप धारण करून समाजाला जीवनदायी ऑक्सिजन, सावली आणि स्वच्छ पर्यावरण देण्यास हातभार लावतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

तसेच वृक्षारोपणामुळे प्रदूषण कमी होऊन पृथ्वी अधिक हिरवीगार आणि सुंदर होण्यास मदत होते, हा संदेशही विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या दिव्यांग विभाग प्रमुख श्रीमती श्वेता दैवज्ञ, सतीश ओहोळ, अरुण रुपवते आणि अजयकुमार मरकड यांनी मोलाचे सहकार्य केले. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून, निसर्ग संवर्धनाचा हा संदेश सर्वत्र कौतुकास्पद ठरत आहे.

# मानवतेचा संदेश देत संत निरंकारी मिशनचे मदतकार्य

## पिंपरी-चिंचवडमध्ये स्वच्छता अभियान, गरजूंना अन्नदान

पिंपरी-चिंचवड : (स. गांवकरी)

मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊन नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पूर ओसरल्यानंतर परिसरात साचलेला चिखल, कचरा व घाणीमुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत 'मानवतेची सेवा हीच ईश्वरसेवा' या संदेशाला कृतीत उतरवत संत निरंकारी मिशनच्या सेवादल यांनी पूरग्रस्त भागात स्वच्छता अभियान राबवून नागरिकांना दिलासा दिला. निरंकारी मिशनच्या स्वयंसेवकांनी रस्ते, सार्वजनिक ठिकाणे तसेच पूरग्रस्त वस्त्यांमध्ये श्रमदान करत पूरग्रस्त घरांतील चिखल व कचरा हटविण्याचे कार्य केले. परिसर स्वच्छ व सुरक्षित करण्यासाठी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. याचबरोबर पूरग्रस्त व गरजू नागरिकांसाठी शिजवलेल्या अन्नाचे वितरण करण्यात आले. अनेक कुटुंबांना वेळेवर भोजन उपलब्ध करून देत त्यांच्या अडचणीच्या काळात आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या सेवाकार्यात मिशनच्या सेवादलातील स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. संत निरंकारी मिशनचे हे सेवा कार्य निरंकारी सदगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या मानवता, प्रेम, करुणा आणि निःस्वार्थ सेवेच्या प्रेरणेतून राबविण्यात आले. समाजात जात, धर्म, भाषा किंवा पंथ यांचा भेद न करता प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे, हा मिशनच्या समाजसेवेचा मूलभूत दृष्टिकोन असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. स्थानिक नागरिकांनी या सेवाकार्याचे मनापासून स्वागत करत संत निरंकारी मिशनच्या स्वयंसेवकांनी संकटकाळात दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपत्तीच्या काळात समाजासोबत खंबीरपणे उभे राहत सेवा, समर्पण आणि मानवतेचा संदेश देणारे हे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले.




# मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये विकारावर यशस्वी शस्त्रक्रिया

पुणे : (स. गांवकरी)

मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी येथील हृदयविकारतज्ज्ञ आणि कार्डिओव्हॅस्क्युलर अँड थोरॅसिक सर्जरी (CVTS) विभागाने 84 वर्षीय रुग्णावर अत्यंत गुंतागुंतीच्या टाइप-ए एओर्टिक डिसेक्शन या जीवघेण्या आजारावर यशस्वी बेंटॉल (Bentall) शस्त्रक्रिया करून त्याला नवजीवन दिले. रुग्णाला अशक्तपणा आणि पोटात अस्वस्थता जाणवत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सीटी अँजिओग्राफीसह विविध तपासण्यांमध्ये महाधमनीच्या चढत्या भागापासून (Ascending Aorta) ते मूत्रपिंडाखालील भागापर्यंत (Infrarenal Abdominal Aorta) पसरलेले टाइप-ए एओर्टिक डिसेक्शन असल्याचे निदान झाले. हा आजार कोणत्याही क्षणी महाधमनी फुटण्याचा आणि अचानक मृत्यूचा धोका निर्माण करणारा असल्याने तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला.



सीव्हीटीएस शल्यचिकित्सकांनी बायोप्रोस्थेटिक एओर्टिक व्हॉल्व्ह आणि व्हॅस्क्युलर कंड्युटचा वापर करून बेंटॉल शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली. या शस्त्रक्रियेदरम्यान खराब झालेला महाधमनीचा मूळ भाग आणि चढता भाग बदलण्यात आला तसेच हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या कोरोनरी धमन्यांचे पुनर्स्थापन करण्यात आले.

# मुंबईसह राज्यातील सर्व शिक्षक संघटना एकवटल्या

- आझाद मैदानात बीएलओ एसआयआर टिईटी सक्तीच्या विरोधात ५ हजार शिक्षकांचा हल्लाबोल

मुंबई-ठाणे (स. गांवकरी)

शिक्षकांना टीईटी अनिवार्यता, बीएलओ व एसआयआर यासारखी अशैक्षणिक कामे, पदोन्नती विषयक अन्यायकारक अटी संच मान्यतेचे चुकीचे निकष, व पदवीधर शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी या मागण्यांसाठी आज आझाद मैदानात सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले या आंदोलनाला मुंबई ठाणे रायगड व पालघर यासह राज्यातील ५ हजार प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते असे शिक्षक महासंघ मुंबई कोकण विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी सांगितले




या आंदोलनात मुंबईतील शिक्षक महासंघ शिक्षक भारती शिक्षक सेना यासह राज्यातील महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेसह २५ संघटना सहभागी झाल्या होत्या या आंदोलनात शिक्षक महासंघाचे मुंबई कोकण विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे राज्याध्यक्ष केशवराज जाधव राज्य सचिव राजेश सुर्वे, शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे शिक्षक सेनेचे कार्याध्यक्ष जालिंदर सरोदे यासह शिक्षक आमदार ज.मो.अभ्यंकर व माजी आमदार कपिल पाटील यांनी संबोधित केले

निवडणूक, जनगणना, मतदार यादी पुनरावलोकन यांसारख्या प्रशासकीय कामांमुळे शिक्षकांचा मोठा वेळ जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आवश्यक वेळ मिळत नाही. शिक्षकांचे मुख्य काम अध्यापन असून, त्यांना अतिरिक्त शासकीय कामांमधून मुक्त करणे गरजेचे असल्याचे शिक्षक महासंघ मुंबई व कोकण विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी मांडले. अनेक वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेल्या शिक्षकांना पुन्हा पात्रता परीक्षा देण्याची सक्ती योग्य नसून सध्याची TET रचना अधिक व्यवहार्य करण्याची मागणी राजेश सूर्वे यांनी केली राज्य सरकारच्या नव्या पदोन्नती धोरणावरही शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे. सध्याच्या व्यवस्थेत अनुभव आणि ज्येष्ठतेचा पुरेसा विचार होत नसल्यामुळे दीर्घकाळ सेवा करणाऱ्या शिक्षकांवर अन्याय होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून BLO काम, TET नियम आणि पदोन्नती धोरणाबाबत तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. सरकारने लवकर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही शिक्षक संघटनांनी दिला आहे.



# उपचाराअभावी बालकाची फरफट

■ पांडाणे आश्रमशाळेतील धक्कादायक प्रकार
■ सामाजिक कार्यकर्त्यांनी दाखवली माणुसकी

नाशिक : (स. गांवकरी)



दिंडोरी तालुक्यातील पांडाणे येथील शासकीय अनुदानित आश्रमशाळेत घडलेल्या एका धक्कादायक घटनेने ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या हाताच्या बोटाला गंभीर दुखापत होऊनही त्याला वेळेत वैद्यकीय उपचार मिळू शकले नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर अनुपस्थित असल्याने वेदनेने तळमळणाऱ्या या चिमुकल्याला अखेर गावातील सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वतःच्या वाहनातून खाजगी रुग्णालयात दाखल करून उपचार मिळवून दिले.

मिळालेल्या माहितीनुसार, पांडाणे येथील अनुदानित आश्रमशाळेत शिक्षण घेणारा इयत्ता तिसरीचा विद्यार्थी कुमार दिनेश पिटे याच्या हाताच्या बोटाला खेळताना किंवा इतर कारणामुळे गंभीर दुखापत झाली. विद्यार्थ्याच्या बोटाला फ्रॅक्चर झाल्याचा संशय शिक्षक व ग्रामस्थांनी व्यक्त केला. अशा परिस्थितीत तातडीने उपचार होणे अपेक्षित असताना, आरोग्य यंत्रणेतील निष्काळजीपणाचा आरोप पुढे येत आहे.

घटनेनंतर आश्रमशाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्याला अवघ्या २०० मीटर अंतरावरील स्थानिक पांडाणे प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र तेथे डॉक्टरचं उपस्थित नव्हते. आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांनी "डॉक्टर वणी येथे गेले आहेत" एवढीच माहिती दिल्याचे सांगितले जाते. ते कोणत्या शासकीय कामासाठी गेले होते, त्यांचा पर्यायी वैद्यकीय अधिकारी का उपलब्ध नव्हता, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आली नसल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच स्थानिक सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब चित्ते व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्याला पुन्हा आरोग्य केंद्रात नेले.



नांदेड जिल्हा : हिंगोली, नांदेड व परभणी जिल्ह्यांमध्ये गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी पहाटे १.३७, २.१५, २.१७ आणि ३.२३ वाजता भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अधिकृत माहितीनुसार, या भूकंपांची तीव्रता रिश्टर स्केलवर अनुक्रमे ४.६, ३.६, ३.९ आणि ४.१ इतकी नोंदविण्यात आली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरली येथे होता.

## थोडक्यात बातम्या...



### जामिनावर सुटताच बेकायदेशीर रॅली; सराईत गुन्हेगार जेरबंद

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जेलमधून जामिनावर सुटल्यानंतर बेकायदेशीररीत्या विनापरवाना रॅली काढून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या व सोशल मीडियावर गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला जेरबंद एमआयडीसी पोलिसांनी जेरबंद केले. भोऱ्या उर्फ विठ्ठल नवनाथ काळे (वय १९, रा. बोल्हेगाव फाटा, ता. जि. अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. आरोपी भोऱ्या हा खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी यांसारख्या गंभीर गुन्ह्या मधील प्रमुख आरोपी असून, ४ जुलै २०२६ रोजी त्याची जिल्हा कारागृहातून न्यायालयाने जामिनावर सुटका केली होती. जेलमधून सुटताच आरोपी भोऱ्या आणि त्याच्या १० ते १५ साथीदारांनी बेकायदेशीर जमाव जमवला. त्यांनी सबजेल कारागृहापासून ते नागापूर एमआयडीसी भागापर्यंत मोटारसायकलवर स्वार होऊन मोठमोठ्याने आरडाओरडा करत, घोषणाबाजी करत विनापरवाना रॅली काढली. या बेकायदेशीर रॅलीचा व्हिडिओ आणि ऑडिओ तयार करून तो सोशल मीडियावर प्रसारित करण्यात केला. या प्रकाराची गंभीर दखल घेत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आरोपी भोऱ्यासह धीरज उर्फ जॉकी जॉन आवारे, सुजल उर्फ गोट्या भाकरे, चेतन उर्फ भैय्या संतोष सरोदे, यश शिरसाठ, निकेश विश्वास कळकुंबे, गणेश विठ्ठल काळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यातील मुख्य आरोपीला तत्काळ अटक करण्यात आली आहे. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात, सहायक फौजदार राकेश खेडकर, पोलिस अंमलदार राजू सुद्रिक, शैलेश रोहोकले, संदीप पवार, गणेश चौधरी, किशोर जाधव यांच्या पथकाने केली.

### अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणसाठ्यात वाढ-भंडारदरा ४३ टक्क्यांवर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे जिल्ह्यातील प्रमुख धरणांमध्ये पाण्याची आवक वाढत असून जलसाठ्यातही लक्षणीय वाढ झाली आहे. पाटबंधारे विभागाने मंगळवारी (८ जुलै) सकाळी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार भंडारदरा, निळवंडे, मुळा, आढळा, घोड, सीना, खैरी, विसापूर आदी धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या भंडारदरा धरणात सध्या सुमारे ४,४६० दशलक्ष घनफूट पाणीसाठा असून धरण ४३.८३ टक्के भरले आहे. तर निळवंडे धरणात २,९८६ दशलक्ष घनफूट पाणीसाठा असून धरणाची टक्केवारी ४६.३२ टक्क्यांवर पोहोचली आहे.

### विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : ८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघांतर्गत एकूण ३१२ मतदारयादी भागांमध्ये विशेष सखोल पुनर्निरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. या कामासाठी वारंवार सूचना देऊनही १८ बीएलओ (Booth Level Officer) व ३ पर्यवेक्षक यांची प्रगती अत्यंत कमी असल्याने त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी दिली.

## शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी समन्वय समिती आक्रमक

### १० दिवसांत निर्णय न झाल्यास आझाद मैदानावर आंदोलनाचा इशारा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने कार्यरत शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी गिते यांना निवेदन देण्यात आले.

शासनाने शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा येत्या दहा दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास मुंबईच्या आझाद मैदानावर राज्यव्यापी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा समन्वय समितीचे अध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित यांनी दिला .

निवेदनात कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांसाठी TET अनिवार्यता शिथिल करणे, प्रलंबित पदोन्नती प्रक्रिया तात्काळ सुरू करणे, संयमन धोरण रद्द करणे तसेच प्राथमिक शिक्षकांना BLO (Booth Level Officer) सारख्या अशैक्षणिक कामांतून पूर्णपणे मुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, शिक्षकांवर सातत्याने वाढणाऱ्या अशैक्षणिक जबाबदाऱ्यांमुळे अध्यापनाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीलाही त्याचा फटका बसत आहे. तसेच TET, पदोन्नती आणि संयमन धोरणामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभरातील शिक्षकांच्या सहभागातून मुंबईच्या आझाद मैदानावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा समन्वय समितीच्या वतीने देण्यात आला.

या निवेदनावर समन्वय समितीचे अध्यक्ष सुनील पंडित, सचिव आप्पासाहेब शिंदे, शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांच्यासह जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नवी मुंबई महापालिकेकडे तातडीच्या दुरुस्तीची मागणी!

नवी मुंबई : (स. गांवकरी)

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील ऐरोली येथे उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोरील गटारावरील चेंबरचे झाकण तुटलेल्या अवस्थेत असून त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या संदर्भात महापालिकेचे आयुक्त यांना अनेक वेळा लेखी व तोंडी सूचना देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.




सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने ऐरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे पर्यटनाचे प्रमुख आकर्षण बनले आहे. या स्मारकाला भेट देण्यासाठी देश-विदेशातून नागरिक, पर्यटक तसेच संपादक, पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर आवर्जून भेट देत आहेत. अशा परिस्थितीत स्मारकासमोरील तुटलेले चेंबरचे झाकण पर्यटक व नागरिकांसाठी अपघाताला निमंत्रण देणारे ठरत आहे आणि त्यामुळे स्मारकाच्या परिसराच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचत आहे.

तरी संबंधित विभागाने या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन तुटलेले चेंबरचे झाकण त्वरित बदलावे, आवश्यक दुरुस्तीचे काम पूर्ण करावे आणि कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

## वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या दिंडीचे १३ जुलैला नगरमधून प्रस्थान

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

येथील वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे मंगळवार दिनांक १३ जुलै रोजी वैष्णव सेवा भक्त मंडळ पायी दिंडी सोहळा पंढरपूर आषाढी दिंडी साठी प्रस्थान करणार असून दिंडीचे हे १५ वे वर्ष आहे. ब्रम्हलीन समर्थ सद्‌गुरु हरिहर महाराज व ब्रम्हलीन शंकर महाराज जोशी, ब्रम्हत्तीन गोपाल चैतन्य महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने काढण्यात येते.कपिलेश्वर महादेव मंदिर,माळीवाडा,अहिल्यानगर येथून दि. १३ जुलै रोजी दुपारी २ वा.वाजता निघणार आहे,यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दिंडीला विशेष अनमोल सहकार्य परशुराम आसाराम मचे, संतोष मोहनराव मेहेत्रे व परिवार,भाऊसाहेब उनवणे (मा. नगरसेवक, अहिल्यानगर), राजुशेठ गंधाडे, विजयप्रकाश चंद्रभूषण त्रिपाठी यांनी तर दिंडीची वाहन व्यवस्था(ट्रक) मोहनराव मेहेत्रे, जलव्यवस्था राजेंद्र फुलारी, डिझेल सेवा अहिल्या वीर,जगन औशीकर, कै शांताबाई कुलकर्णी स्मरणार्थ संजय कुलकर्णी यांजकडून ट्रॅक्टर सेवा अंकुश तरटे, कैजयेश पाटील स्मरणार्थ वर्षाताई वासू (द्रविड) यांजकडून, वाहन सेवा अर्जुन चांदगुडे, मछिंद्र जगताप, रथसेवा बबन महाराज गुंजाळ तर पंढरपूर निवास व्यवस्था रावसाहेब भगत, किर्तन सेवा बाळकृष्ण महाराज खेसे यांची आहे. दिंडीला प्रेरणा/आशिर्वाद स्व.सरस्वती चंद्रभूषण त्रिपाठी,यादव बाबुराव खेडकर, स्व. सौ. भागुबाई यादवराव खेडकर, कै.ठकुबाई हरिभाऊ विधाटे, गं.भा.ताराबाई मोकाटे, मच्छिंद्र महाराज राऊत (पिंपळेश्वर संस्थान) यांची आहे. दिंडी २६ जुलैला पंढरपूरला पोहचणार आहे तर सांगता गुरुपौर्णिमेला २९ जुलै ला सुनिल प्रकाश चंद्रभूषण त्रिपाठी यांचे निवासस्थान, भवानी नगर येथे आयोजित केला आहे. दिंडी सोहळाचा पंढरपूर येथील मुक्काम योग भवन, पंढरपूर येथे राहणार आहे.

## ग्रामीण शिक्षण, १०० टक्के शिष्यवृत्ती आणि कोकणासाठी स्वतंत्र उच्च शिक्षण आराखड्याची आमदार शेखर निकम यांची मागणी

■ पावसाळी अधिवेशनात शिक्षक पदे, बंद शाळा, कौशल्य विकास आणि शैक्षणिक कर्जावरील अडचणींचे मुद्दे मांडले

मुंबई : (स. गांवकरी)




राज्याच्या पावसाळी अधिवेशनात शिक्षण व कौशल्य विकास विभागावरील चर्चेदरम्यान आमदार शेखर निकम यांनी ग्रामीण शिक्षण, शिष्यवृत्ती, शिक्षकांची उपलब्धता, कौशल्य विकास आणि कोकणातील शिक्षण व्यवस्थेशी संबंधित विविध प्रश्न सभागृहात उपस्थित करत शासनाकडे ठोस उपाययोजनांची मागणी केली.

व्यावसायिक शिक्षण अधिकाधिक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या निर्णयाचे स्वागत करताना, मराठा समाजासह इतर वंचित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना दिली जाणारी ५० टक्के शिष्यवृत्ती १०० टक्के करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. फार्मसी शिक्षणाच्या संदर्भात फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून महाविद्यालयांना मान्यता मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणून देत, ही प्रक्रिया गतिमान करण्यासाठी शासनाने प्रभावी पाठपुरावा करावा, अशी मागणी त्यांनी केली. कोकणातील विद्यार्थीसंख्या घटल्यामुळे बंद करण्यात आलेल्या ग्रामीण शाळांचा प्रश्न उपस्थित करताना, तिवरे धरण दुर्घटनेनंतर प्रभावित भागातील शाळांची परिस्थिती त्यांनी सभागृहासमोर मांडली. कमी विद्यार्थीसंख्येच्या कारणावरून बंद झालेल्या शाळांची फेरतपासणी करून त्या पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घ्यावा, अशी त्यांनी मागणी केली. राज्यात विदेशी विद्यापीठांना परवानगी देण्याच्या निर्णयाचे स्वागत करताना, ग्रामीण विद्यार्थ्यांनाही दर्जेदार उच्च शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात यासाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्राथमिक स्तरापासूनच स्पर्धा परीक्षा केंद्रित शिक्षणाचा विचार करण्याची सूचना त्यांनी केली. शैक्षणिक कर्ज मिळविताना सर्वसामान्य विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रक्रिया सुलभ करण्याची मागणी करताना, कला, क्रीडा आणि चित्रकला शिक्षकांची पदे कमी झाल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. संचमान्यता धोरणाचा फेरविचार करून ही पदे कायम ठेवावीत, अशी मागणीही त्यांनी केली. याशिवाय 'शिका आणि कमवा' यांसारख्या कौशल्य विकास योजनांचा विस्तार करण्याबरोबरच कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि इतर प्रदेशांच्या गरजांनुसार स्वतंत्र उच्च शिक्षण व कौशल्य विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, समान संधी आणि रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आमदार शेखर निकम यांनी सभागृहात व्यक्त केली.

## महाराष्ट्र क्लिनिकल आस्थापना विधेयक : रुग्ण प्रथम की केवळ नोंदणी? : रुग्णहिताच्या दृष्टीने आवश्यक सुधारणा

अकोले : (स. गांवकरी)



**बाळासाहेब सिताराम औटी**
अध्यक्ष, मध्य महाराष्ट्र प्रांत
अखिल भारतीय ग्राहक पंचायत

महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र क्लिनिकल आस्थापना (नोंदणी व विनियमन) विधेयक, २०२६" सादर करून राज्यातील रुग्णालये, नर्सिंग होम, दवाखाने, निदान केंद्रे आणि इतर क्लिनिकल आस्थापनांना एकसमान कायदेशीर चौकटीत आणण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला आहे. रुग्णालयांची नोंदणी, किमान सेवा मानके, रुग्ण हक्क, तपासणी व्यवस्था आणि डिजिटल नोंदणी यांसारख्या तरतुदींचे स्वागत केले पाहिजे. मात्र कोणताही आरोग्यविषयक कायदा केवळ रुग्णालयांचे नियमन करणारा नसून रुग्णांचे हक्क जपणारा असला पाहिजे. या विधेयकाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की अनेक मूलभूत बाबींमध्ये सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. आज सर्वसामान्य नागरिकाला सर्वाधिक त्रास होतो तो अवाजवी उपचार खर्च, अनपेक्षित बिले, अनावश्यक तपासण्या, माहितीचा अभाव आणि तक्रार निवारणाच्या प्रभावी यंत्रणेच्या अभावामुळे. दुर्दैवाने या सर्व मुद्द्यांवर विधेयक पुरेसे प्रभावी नाही. सर्वप्रथम, विधेयकात उपचार शुल्कावर नियंत्रणाची कोणतीही स्पष्ट व्यवस्था नाही. रुग्णालयाने दरपत्रक लावले म्हणजे दर योग्य आहेत, असे होत नाही. एकाच उपचारासाठी वेगवेगळ्या रुग्णालयांत अनेक पटींनी वेगळे शुल्क आकारले जाते. त्यामुळे स्वतंत्र राज्य आरोग्य सेवा शुल्क नियामक प्राधिकरण स्थापन करून उपचार, शस्त्रक्रिया, तपासण्या, आयसीयू, रूमभाडे आणि इतर सेवांचे वाजवी कमाल दर निश्चित करणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे, रुग्णाला उपचार सुरू करण्यापूर्वी लेखी खर्चाचा अंदाज मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार असला पाहिजे. अनेक कुटुंबांना उपचारानंतर लाखो रुपयांचे बिल समोर येते आणि त्यांना कर्ज काढण्याची वेळ येते. हा अन्याय थांबवण्यासाठी कायद्यात स्पष्ट तरतूद आवश्यक आहे.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तपशीलवार बिल. प्रत्येक बिलामध्ये डॉक्टरांचे मानधन, शस्त्रक्रिया खर्च, औषधे, कंझ्युमेबल्स, तपासण्या, नर्सिंग शुल्क, रूमभाडे आणि इतर सर्व खर्च स्वतंत्रपणे नमूद करणे बंधनकारक असले पाहिजे.

रुग्णाला बाहेरून औषधे किंवा इम्प्लांट खरेदी करण्याचा पर्याय कायद्यात स्पष्टपणे नमूद केला पाहिजे. रुग्णालयातूनच साहित्य घेण्याची सक्ती झाल्यास स्पर्धा कमी होते आणि खर्च वाढण्याची शक्यता निर्माण होते. आपत्कालीन परिस्थितीत कोणत्याही रुग्णाकडून ठेव रक्कम (डिपॉझिट) मागून उपचार थांबविणे अमानवी आहे. "प्रथम उपचार, नंतर आर्थिक प्रक्रिया" हे तत्त्व कायद्यात स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. रुग्ण हक्क सनद हा विधेयकातील स्वागतार्ह भाग आहे; परंतु रुग्ण हक्कांचे उल्लंघन झाल्यास काय कारवाई होईल, हेही तितकेच स्पष्ट असले पाहिजे. केवळ हक्क जाहीर करून उपयोग नाही; त्यांची अंमलबजावणी सुनिश्चित करणारी व्यवस्था आवश्यक आहे.

आजही अनेक रुग्णांना वैद्यकीय नोंदी, तपासणी अहवाल किंवा डिस्चार्ज सारांश वेळेवर मिळत नाही. त्यामुळे दुसरे वैद्यकीय मत, विमा दावा किंवा न्यायालयीन प्रक्रिया अडचणीत येते. त्यामुळे सर्व वैद्यकीय नोंदी २४ तासांच्या आत उपलब्ध करून देणे बंधनकारक केले पाहिजे. रुग्णांच्या तक्रारींचे जलद निराकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र रुग्ण तक्रार निवारण प्राधिकरण आणि राज्यस्तरावर आरोग्य लोकपाल असणे आवश्यक आहे. यामुळे रुग्णांना न्यायालयात न जाता सुलभ आणि जलद न्याय मिळू शकेल. राज्य क्लिनिकल आस्थापना परिषदेमध्ये केवळ शासकीय अधिकारी आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधी न ठेवता ग्राहक संघटना, रुग्ण प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी आणि सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ यांचाही समावेश केला पाहिजे. कायद्याचा केंद्रबिंदू रुग्ण असेल तर निर्णय प्रक्रियेत त्याचा आवाजही असला पाहिजे. याशिवाय तपासणी अहवाल, दंडात्मक कारवाई, नोंदणीची स्थिती, सेवा शुल्क आणि गुणवत्ता मूल्यांकन सार्वजनिक डिजिटल पोर्टलवर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पारदर्शकतेमुळे चांगल्या संस्था पुढे येतील आणि नियमभंग करणाऱ्या संस्थांवर नैसर्गिक नियंत्रण राहील. अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे मत स्पष्ट आहे की हा कायदा डॉक्टरविरोधी किंवा रुग्णालयविरोधी नसून रुग्णहितवादी आणि प्रामाणिक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देणारा असला पाहिजे. प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या डॉक्टरांचे संरक्षण आणि रुग्णांचे आर्थिक व वैद्यकीय शोषण करणाऱ्यांवर कठोर नियंत्रण – हा या कायद्याचा मूलभूत उद्देश असला पाहिजे. महाराष्ट्राला असा कायदा हवा जो "रुग्ण प्रथम – नफा नंतर" या तत्त्वावर आधारित असेल. रुग्ण हा ग्राहक आहे, परंतु तो केवळ ग्राहक नाही; तो उपचारासाठी डॉक्टरांवर आणि आरोग्य व्यवस्थेवर विश्वास ठेवून येतो. त्या विश्वासाचे संरक्षण करणे ही शासन, वैद्यकीय क्षेत्र आणि समाज या तिघांचीही संयुक्त जबाबदारी आहे. म्हणूनच राज्य शासनाने हे विधेयक अंतिम करण्यापूर्वी रुग्ण संघटना, ग्राहक संघटना, वैद्यकीय तज्ज्ञ, रुग्णालय संघटना आणि कायदेतज्ज्ञ यांच्याशी व्यापक चर्चा करून आवश्यक दुरुस्त्या स्वीकाराव्यात. यामुळे महाराष्ट्राला देशातील सर्वात रुग्णकेंद्रित, पारदर्शक आणि उत्तरदायी आरोग्य कायदा मिळू शकेल. हीच अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची भूमिका आणि राज्य शासनाकडे नम्र परंतु ठाम मागणी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे



## नांदेड-मुंबई विमानसेवा लवकरच सुरू होणार; मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड-मुंबई नियमित विमानसेवा लवकरच सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड जिल्ह्यातील आमदारांच्या शिष्टमंडळाला दिली. या निर्णयामुळे नांदेडसह मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. आमदार हेमंत पाटील, राष्ट्रादीचे नेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार तुषार राठोड, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार भीमराव केराम, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार आनंदराव बोढारकर आणि आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन विमानसेवा तातडीने सुरू करण्याची मागणी केली. सध्या नांदेड विमानतळ सर्व सुविधांनी सुसज्ज असले तरी मुंबई विमानतळावर स्लॉट उपलब्ध नसल्यामुळे ही सेवा बंद आहे. मुंबई येथे नव्या विमानतळाचे काम सुरू असल्याने भविष्यात स्लॉट उपलब्ध होऊन नांदेड-मुंबई विमानसेवा नियमित सुरू होण्याचा मार्ग मोकळा होईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दररोज सकाळी नांदेडहून मुंबईकडे आणि रात्री मुंबईहून नांदेडकडे विमानसेवा सुरू झाल्यास उद्योग, व्यापार, पर्यटन आणि व्यावसायिक क्षेत्राला मोठी चालना मिळेल. तसेच नांदेड, लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांनाही या सेवेचा लाभ होणार असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. यावेळी छत्रपती संभाजीनगर महसूल विभागाचे विभागीय आयुक्तालय नांदेड येथे स्थापन करण्याच्या मागणीकडेही मुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधण्यात आले. २०२५ पासून प्रलंबित असलेला हा प्रश्न तातडीने सोडविण्याची विनंती करण्यात आली. नांदेड येथे विभागीय आयुक्तालय झाल्यास नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचून विकासाला गती मिळेल, असे शिष्टमंडळाने सांगितले. यावर सकारात्मक भूमिका घेत हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालतीचे आयोजन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी जुलै-2026 महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी 14 जुलै 2026 रोजी सकाळी 11 ते 1.30 वा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## पुतळ्याच्या कठड्यास धडकणाऱ्या टेम्पोचालक व मालकावर गुन्हा

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर येथील पंचलिंग चौकात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या कठाड्यात धडकणाऱ्या टेम्पो चालक व मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे . टेम्पो टाटा कंपनीचा ७०९ मॉडेलचा टेम्पो नं एम एच १४ एफ ६४१२ हा कुसुर बाजुकडुन पंचलिंगचौक बाजुकडे येत होता . चालक सिद्धू लक्ष्मण जमादार रहदारीचे नियमाकडे दुर्लक्ष करुन हयगयीने व अविचाराने भरधाव वेगात टेम्पो चालवला . यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याचे कठड्यास धडकुन अपघात करुन अपघातात कठड्याचे नुकसान झाले आहे. टेम्पो चालक सिध्दु लक्ष्मण जमादार रा.नारायणगाव,आवटेमळा त्याच्याकडे तपासणी केली असता वाहन चालक परवाना वाहन नाही. टेम्पो वाहन चालवण्यास ताब्यात दिले म्हणून मालक यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ , ३२४ ( ४ ), सह मो.वा.का.कलम १८४ , १८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## तांबोळी युवकाला पुराच्या पाण्यातून बाहेर काढण्यात यश



शिवनेरी (स. गांवकरी) : वडज धरणातील परिसरात गेली काही दिवसापासुन मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू झाला. यावेळी मिना नदी पात्रातून पुरा प्रमाणे पाणी वाहत होते. वडगाव साहनी मिना नदी पात्रा जवळ जानुबाई मंदिरात संदीप अनंता तांबोळी वय ३२ वर्ष हा युवक अडकला होता. पाण्याचा प्रवाह वाढल्याने त्यास बाहेर येता येत नव्हते रेस्क्यू टीमच्या मदतीने बाहेर काढण्यात यश आले .यावेळी जुन्नर महसूल विभाग , पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड , जुन्नर पोलीस टीम तुषार वाबळे, सुनील शिंदे, पोलीस पाटील गणेश जेडगुले , शिवजन्मभूमी जुन्नर रेस्क्यू टीमचे सदस्य राजकुमार चव्हाण, कपिल कबाडी, संकेत कबाडी, सुनील शिंदे, महिंद्रा नवले, लखन डाडर घटनास्थळी , स्थानिक नागरिक यांच्या मदतीने संदीप तांबोळी या युवकाला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे मनमानी कारभार

## बिलोलीचा प्रश्न विधानसभेत : आ. अंतापूरकरांनी वेधले, लक्षवेधीच्या माध्यमातून शासनाचे लक्ष

बिलोली : (स. गांवकरी)

देगलूर - बिलोली मतदारसंघातील बिलोली येथील क्रीडा संकुलाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विकासकामांचा प्रश्न आज विधानसभेत चांगलाच गाजला. आ. जितेश अंतापूरकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हा मुद्दा उपस्थित करत सरकारला जाब विचारला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन कार्यकारी अभियंता कोटलावार यांच्या मनमानी व निष्काळजी कार्यपद्धतीवर त्यांनी गंभीर आक्षेप नोंदवले. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्याच्या कामकाजाबाबत सभागृहातच नाराजी व्यक्त केली. तातडीने चौकशी करून दोषी आढळल्यास



नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी दिली.

बिलोली येथील क्रीडा संकुलाच्या विविध विकासकामांसाठी शासनाने वाढीव निधी मंजूर करूनही अनेक वर्षांपासून कामे रखडली आहेत. देगलूर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन कार्यकारी अभियंता कोटलावार यांच्या सुस्त व मनमानी कारभारामुळे ही कामे पूर्णत्वास जाऊ शकली नसल्याचा आरोप आ. अंतापूरकर यांनी सभागृहात केला. परिणामी ग्रामीण भागातील शेकडो होतकरू खेळाडूंना दर्जेदार क्रीडा सुविधा मिळत नसून त्यांच्या सरावावर, स्पर्धात्मक तयारीवर आणि उज्ज्वल भवितव्यावर विपरीत परिणाम होत असल्याची बाब त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिली.

या गंभीर विषयावर आक्रमक भूमिका घेत आ. अंतापूरकर यांनी लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप केला. अधिकाऱ्यांच्या निष्काळजी आणि मनमानी कारभारामुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असून ग्रामीण भागातील खेळाडूंवर अन्याय होत असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले.

सभागृहातील चर्चेदरम्यान आ. अंतापूरकर म्हणाले, "ग्रामीण भागातील खेळाडूंच्या स्वप्नांशी कुणालाही खेळू दिले जाणार नाही. अधिकारी लोकप्रतिनिधींच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून मनमानी करत असतील, तर त्यांना जबाबदार धरलेच पाहिजे. खेळाडूंच्या

### आ. अंतापूरकरांची आक्रमता, अधिकारी अडचणीत

बिलोली क्रीडा सकुंलच्या प्रलंबित प्रश्नावर आवाज उठवताना आ.अंतापूरकर हे आक्रमकतेने देगलूर सां.बा.विभागाचे तत्कालीन कार्यकारी अभियंता संदीप कोटलावार यांच्या मनमानी कारभार चव्हाट्यावर आणला याची दखल घेत सा.बा.विभागाचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी भर सभागृहात कार्यकारी अभियंता कोटलावार यांच्या कार्यपध्दतीवर त्रीव नाराजी व्यक्त करत चौकशी करुन कडक कार्यवाही करण्याचे ग्वाही दिले

भविष्याशी कोणतीही तडजोड आम्ही सहन करणार नाही.आ. अंतापूरकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीचा तपशील सभागृहात मांडताच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या प्रकरणाची तात्काळ गंभीर दखल घेतली. देगलूर येथील तत्कालीन कार्यकारी अभियंता कोटलावार यांच्या कामकाजाबाबत त्यांनी भर सभागृहात नाराजी व्यक्त केली. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच बिलोली क्रीडा संकुलाची सर्व प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित यंत्रणेला स्पष्ट निर्देश दिले जातील, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले.

## महामार्गावरील उड्डाणपुला खालील मलबा ढासळला

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड-लातूर महामार्गाचे काम प्रगती पथावर असून कामाचे शुभारंभ होण्या पुर्वीच निकृष्ट दर्जाच्या कामामुळे विष्णुपुरी येथील एसजीजीएस कॉलेजसमोरील मुख्य पुला खाली भिंत कोसळली व पुला खालील पुर्ण मलबा बाहेर अंतर्गत रस्तावर पडल्यामुळे गुरुवारी सकाळी १० वाजता भिंत कोसळली. यामुळे रस्त्यावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. नदिड- लातूर महामार्गाचे काम सुरू असून अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचा काम होत असल्याचे दिसून येत आहे तर गुरुवारी सकाळी ११ वाजता च्या दरम्यान विष्णुपुरी येथील एसजीजीएस कॉलेजच्या समोरील उड्डाणपुलाची १ भिंत अचानकपणे कोसळली या मध्ये कोणतीही जिवीत हानी झाली नसून मोठा अनर्थ टळला आहे तर काही वाहनावर दगड पडल्याचे समजते . या निकृष्ट कामामुळे एखाद्या निष्पाप प्रवाशांचा बळी गेला असता तर याची जबाबदारी प्रशासन घेणार काय त्यामुळे प्रशासना सह ठेकेदार केटी आय एल यांच्या वर प्रशासनाने कठोर कारवाई करण्यात यावा असे नागरिकात तिव्र संताप व्यक्त केला जात होता नांदेड-लातूर महामार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी विष्णुपुरी येथील नागरिकांनी केली आहे. गुरुवारी सकाळी घडलेल्या या घटनेमुळे विष्णुपुरी येथून नांदेड शहरात येणाऱ्या सर्विस रोड बंद झाला होता. गुरूवारी सकाळी ११ च्या दरम्यान या उड्डाणपुलाचा एक मोटा भाग अचानक ढासळला, त्याच वेळी तेथून स्कुटीवरून २ महाविद्यालयीन विद्यार्थिनी कॉलेजला जात असल्याचे माहीती तेथिल नागरीकांनी सांगीतले मात्र भिंतीचा ढिगारा अंगावर पढेल असे समजताच व त्यांच्या अंगावर येताच दोन्ही मुली स्कुटीसह खाली पडल्या.

## कुटुंबावर भर पावसात उघड्यावर राहण्याची वेळ

भंडारदरा : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसरातील मुरशेत गावातील पंतप्रधान आवास योजनेचा लाभार्थी अर्जुन बुधा गांगड याला घरकुलाचा पुढील हप्ता न मिळाल्याने भर पावसात कुटुंबासह उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे. जुने पत्रे व प्लास्टिकचे कागद लावून पावसापासून बचाव करत हे कुटुंब दिवस काढत असल्याची धक्कादायक बाब समोर आली असून, संबंधित विभागाच्या हलगर्जीपणामुळे ही परिस्थिती ओढवल्याचा आरोप समाजसेवक अनंत घाणे यांनी केला आहे.

मुरशेत गावात पंतप्रधान आवास योजना, शबरी आवास योजना आणि रमाई आवास योजनेअंतर्गत अनेक लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाली आहेत. सन २०२४-२५ मध्ये पंतप्रधान आवास योजनेसाठी अर्जुन बुधा गांगड पात्र ठरला. त्याला पहिल्या टप्प्यात १५ हजार रुपयांचा हप्ता मिळाल्यानंतर त्याने



घराचे बांधकाम सुरू केले. दुसऱ्या हप्त्यासाठी आवश्यक छायाचित्रे व कागदपत्रे वेळेत सादर करूनही त्याला आजतागायत रक्कम मिळालेली नाही.

दुसऱ्या हप्त्यासाठी अर्जुन गांगड यांनी संबंधित कार्यालयाचे अनेकदा हेलपाटे मारले. मात्र "वरून निधी आलेला नाही, आला की टाकतो," अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन त्यांची बोळवण करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्वतःकडील पैसे खर्च करून तसेच हप्ता मिळेल या विश्वासावर बांधकाम साहित्य उधारीवर घेऊन त्यांनी काम सुरू ठेवले. मात्र आता आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावल्याने बांधकाम थांबले असून दुकानदारांकडून उधारीची मागणी सुरू आहे. त्यामुळे अपूर्ण घरातच जुने पत्रे व प्लास्टिक टाकून कुटुंबासह राहण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. याच गावात काही लाभार्थ्यांचे बांधकाम पूर्ण झाले नसतानाही त्यांना पूर्ण हप्ते मिळाल्याचा, तर काहींचे केवळ पायाभरणीपर्यंतचे काम असतानाही दोन-दोन हप्ते वितरित झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष काम न करता हप्ते कसे मिळाले, याबाबतही संशय व्यक्त करण्यात येत असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

प्रामाणिकपणे बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांना हप्ते मिळत नसताना इतरांना निकषांशिवाय निधी कसा वितरित झाला, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

आदिवासी भागातील अनेक गावांमध्येही अशीच परिस्थिती असल्याचा दावा समाजसेवक अनंत घाणे यांनी केला आहे. शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## गोगाव जिल्हा परिषद शाळा ते गोगाव पर्यंत रस्त्याची दुरवस्था

### विद्यार्थ्यांना करावे लागतेय तारेवरची कसरत





अक्कलकोट : (स. गांवकरी)

गोगांव तालुका अक्कलकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ते गोगाव पर्यंतचा रस्त्याची प्रचंड मोठी दुरवस्था झाली आहे. वागदरी ते गोगाव खैराट हा रस्ता अतिशय खराब झाला असून गोगाव जिल्हा परिषद शाळा पासून ते गोगाव गावापर्यंत रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत .पावसाळ्यात संपूर्ण पाणी रस्त्यावर थांबल्याने अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. रस्त्यावर पाणी साचल्याने रस्त्याला तळ्याचे स्वरूप येत आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी हा एकच रस्ता असल्याने या रस्त्याने चालत शाळेत जाणे जिकरीचे बनले आहे. पावसाळ्यात रस्ता कुठे व खड्डा कुठे आहे हे दिसत नसल्याने विद्यार्थीना खड्यात पडून शाळेत जावा लागत आहे. या रस्त्यावरून वाहन चालवताना चालकास कसरत करावी लागत आहे.तर मोटरसायकल स्वारांची तारेवरची कसरत चालू आहे, रस्त्याची अवस्था अतिशय बिकट बनले असून रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता असा सवाल गावकरी व प्रवासी करत आहेत. तरी संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याने याकडे जातीने लक्ष देऊन वागदरी ते खैराट व जिल्हा परिषद शाळा गोगाव ते गोगाव गावापर्यंतचा पर्यंत चा रस्ता दुरुस्त करून द्यावा अन्यथा रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.

> गेल्या अनेक वर्षापासून पावसाळ्यात सदर रस्ता चिकलमय होत असून जिल्हा परिषद शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना चिखलातून जाव लागत आहे सदर रस्ता गावास जोडणारा मुख्य रस्ता असून पांढरा दिवसांपूर्वी झालेल्या पाऊसने वडयाजवळील फूलाचे मोठी नुकसान झालेले आहे या बाबत आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्याकडे पाठपुरावा चालू असून लवकर जिल्हा नियोजन मधून निधी मिळेल अशी आशा आहे
>
> **- कमलाकर सोनकांबळे**
> **उपसरपंच गोगांव**

## अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी लवकरच मंत्रिमंडळात?

सोलापूर : (स. गांवकरी)

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर मुंबईत पार पडलेल्या राज्य शासनाच्या एका अत्यंत महत्त्वाच्या आणि हायव्होल्टेज बैठकीनंतर सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या उच्चाधिकार समितीच्या बैठकीला राज्यातील मोजकेच दिग्गज नेते उपस्थित होते. विशेष म्हणजे, या संपूर्ण बैठकीत सोलापूर जिल्ह्यातून एकमेव आमदार म्हणून अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी हे थेट राज्याच्या सर्वोच्च नेत्यांच्या समवेत उपस्थित राहिल्याने, कल्याणशेट्टी यांना लवकरच मंत्रिमंडळात स्थान मिळणार असल्याची जोरदार चर्चा सोलापूर जिल्ह्यात सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची



आमदार कल्याणशेट्टी यांच्यावर खास मर्जी असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. विधिमंडळाच्या मंत्रिमंडळ बैठक सभागृहात पार पडलेल्या या विशेष बैठकीला राजकीय क्षेत्रातील मातब्बर नेत्यांची उपस्थिती होती. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह देशाचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री तथा खासदार नारायण राणे, मंत्री चंद्रकांत पाटील, शंभूराज देसाई, हसन मुश्रीफ, आमदार जयंत पाटील आणि आमदार रोहित आर. पाटील यांसारखे दिग्गज नेते उपस्थित होते.

# सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र घोरपडे यांच्याकडून मदतीचा हात

## राम शिंदे यांनी मानले आभार : अतिवृष्टीने विस्कळीत झालेल्या टाकेद येथील नुकसानग्रस्त कातकरी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

सर्वतीर्थ टाकेद : (स. गांवकरी)

इगपुरी तालुक्यातील ग्रामपंचायत सर्वतीर्थ टाकेद बु येथील कातकरी वस्तीत गेल्या दोन दिवसांपासून बरसत असलेल्या जोरदार अतिवृष्टीमुळे पावसाचे पाणी झोपडपट्टी घरांमध्ये घुसले आणि सर्व कातकरी वस्तीतील कुटुंबाचे जनजीवन विस्कळीत झाले,संबंधित आपत्ती प्रशासनाला ही बाब सामाजिक कार्यकर्ते पत्रकार राम शिंदे देखील कळवली परंतु स्थलांतर वगळता या बांधवांना उपजीविकेसाठी कोणीही मदत केली नाही याची थेट दखल सर्वतीर्थ टाकेद बु येथील प्रसिद्ध राम सीता लॉन्सचे संचालक सामाजिक



कार्यकर्ते गोरगरिबांच्या कायम सेवेत कार्यतत्पर असणारे राजेंद्र घोरपडे यांनी घेतली व सामाजिक कार्यकर्ते राम शिंदे ,शांताराम भांगे यांच्या समवेत प्रत्यक्षात या कातकरी वस्तीची पाहणी केली.परिस्थिती बघताच सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र घोरपडे यांच्या डोळ्यात पाणी आले आणि त्यांनी स्थानिक प्रशासनाची चांगलीच विकेट घेतली राहण्यासाठी जागा नाही घरातील जीवनावश्यक वस्तूंचे पावसाच्या पाण्याने मोठे नुकसान झाले आम्ही राहायचं कुठ चूल कशी पेटवायची अश्या विवंचना व्यथा आदिम कातकरी बांधवांनी सामाजिक कार्यकर्ते राम शिंदे राजेंद्र घोरपडे यांचे कडे मांडतात त्वरित ग्रामविकास अधिकारी, तहसीलदार यांच्याशी संपर्क करत गावातील ग्रामपंचायत हॉल मध्ये सर्व कुटुंबियांची राहण्याची सोय केली,तसेच या सर्व ग्रामस्थांची सध्याची परिस्थिती बघता राजेंद्र घोरपडे व त्यांच्या संपूर्ण मित्र परिवार टीम ने लगेचच सर्व नुकसानग्रस्त कातकरी कुटुंबांना तात्काळ प्रत्येकी 5 किलो तांदूळ साखर चहा पावडर व भिस्किटांचे जीवनावश्यक किट सह वाटप करण्यात आले.लहान मुलांना भिस्किटांचे वाटप करताच त्यांच्या चेहऱ्यावर मोठे हास्यमय समाधान बघायला मिळाले. टाकेदच्या कातकरी कुटुंबियांच्या निर्माण झालेल्या परिस्थितीला पूर्णतः स्थानिक ग्रामपंचायत ,व सरपंच, उपसरपंच जबाबदार असून ग्रामपंचायतने त्यांच्या काळात पूर्णतः पेसा निधी व 15 वायुक्त निधीचा फक्त टक्केवारीसाठी वापर केला. गोरगरीब जनतेचा पैसा फक्त स्वतःची घरे भरण्यासाठी केला असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र घोरपडे यांनी केला. गेली चार पाच वर्षांपासून सतत पाठपुरावा करत असूनसुद्धा व जण मन घरकुले मंजूर असून सुद्धा स्थानिक पुढारी व प्रशासनाने अजीबतही कातकरी वस्तीतील गटार नाले,घरकुले, संरक्षण भिंत याची अजीबतही दखल घेतली नाही,गटारी फक्त नावालाच पैसे उकळण्यासाठी बांधून ठेवल्या त्यामधून साधे पाणीही पास होत नाही याबाबत इगतपुरी तहसील पंचायत समिती कार्यालयात अनेकदा आंदोलन उपोषण बिऱ्हाड मोर्चा काढण्यात आला परंतु गट विकास अधिकारी यांनी आजपर्यंत आम्हाला फक्त आश्वासन दिले, यापुढे जर आमच्या कातकरी वस्तीतील ग्रामस्थांचा प्रश्न कोणी सोडविला नाही व पुन्हा अशी परिस्थिती निर्माण झाली व संबंधित प्रशासनाने आम्हाला न्याय नाही दिला तर आम्ही सर्व कातकरी कुटुंब बिऱ्हाडा सह इगतपुरी तहसील व पंचायत समिती कार्यालयाच्या मुख्य दालनात येऊन राहू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते राम शिंदे व सर्व आदिम कातकरी बांधवांनी प्रशासनाला दिला आहे. या सर्व कामांची व परिस्थितीची त्वरित चौकशी लावण्यासाठी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे राजेंद्र घोरपडे यांनी सांगितले.यावेळी टाकेद येथील अतिवृष्टीच्या पाण्यामुळे नुकसानग्रस्त कातकरी कुटुंबियांना जीवनावश्यक किट चे वाटप करतांना सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र घोरपडे, राम शिंदे, शांताराम भांगे,डॉ श्रीराम लहामटे, दिलीप बांबळे, दौलत बांबळे, संग्राम पाटील,बाळू मुकणे,ज्ञानेश्वर भले आदींसह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवाडीजवळ भीषण अपघात; तरुणाचा मृत्यू, एक जखमी

पारनेर (स. गांवकरी) : तालुक्यातील खडकवाडी शिवारात टाकळीढोकेश्वर-खडकवाडी मार्गावर झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना मंगळवारी (दि. ७ जुलै) दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधा पोपट केदार (वय २७, रा. जांभुळवाडी, खडकवाडी) आणि आयुष मनोज चिकणे हे दोघे एमएच १६ डीएफ ६५९५ क्रमांकाच्या होंडा युनिकॉर्न दुचाकीवरून टाकळीढोकेश्वरकडून खडकवाडीच्या दिशेने जात होते. समोरून येणाऱ्या एमएच १२ डब्ल्यूजे ५७९० क्रमांकाच्या टाटा टेम्पोने दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीस्वार गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. अपघाताची माहिती मिळताच नातेवाईक व ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. जखमी आयुष चिकणे याला तातडीने खासगी रुग्णवाहिकेतून अहिल्यानगर येथील न्युरॉन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तर बुधा केदार याला टाकळीढोकेश्वर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी मृत बुधा केदार यांचे भाऊ यांनी टाकळीढोकेश्वर पोलिस दूरक्षेत्रात फिर्याद दिली आहे. फिर्यादीत टेम्पो चालक रविंद्र बाळासाहेब टेकवडे (रा. तरडोबाची वाडी, शिरूर, जि. पुणे) याने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच अपघातानंतर जखमींना मदत न करता चालक निघून गेल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे खडकवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत असून टाकळीढोकेश्वर पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### पडघ्यात बियर बारमध्ये तरुणावर जीवघेणा हल्ला; आरोपी अटकेत

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील राहुल बारमध्ये किरकोळ वादातून एका तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात अतुल जाधव हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर लाईफ लाईन या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पडघा पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी अल्ताफ सय्यद (वय २६) याला अटक केली असून, भिवंडी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. प्राथमिक माहितीनुसार, अतुल जाधव आणि आरोपी अल्ताफ सय्यद हे दोघेही राहुल बारमध्ये बसले असताना "खुन्नस का देतोस?" या कारणावरून त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने धारदार हत्याराने अतुल जाधव यांच्यावर वार केले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पडघा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपास सुरू केला. तातडीने तपासाची सूत्रे हलवत पोलिसांनी आरोपीला अटक केली. याप्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत. दरम्यान, या घटनेनंतर पडघा परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी तात्काळ परिस्थिती नियंत्रणात आणत नागरिकांना शांतता आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले आहे.



### सुजय दादा विखे पाटील यांचा सत्कार; कार्यकर्त्याला संधी सन्मान नेतृत्वाचा

अकोले (स. गांवकरी) : भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांनी अकोले तालुक्यातील विकासराव वाकचौरे यांची जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्यपदी निवड केल्याबद्दल कार्यकर्त्यांनी सुजय दादा विखे पाटील यांचा सन्मान केला. लोणी येथील जनसेवा फाउंडेशन येथे अकोले तालुक्याचे आराध्य दैवत अगस्ती महाराज यांची प्रतिमा, टोपी, शाल देऊन माजी खासदार सुजय दादा विखे पाटील यांचा सन्मान करण्यात आला. अकोले तालुक्यामध्ये गेल्या अनेक वर्षापासून विखे पाटील फाउंडेशन च्या माध्यमातून काम करणारे सुगाव गावचे विकास वाकचौरे यांची अहिल्यानगर जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या जिल्हा नियोजन मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. विकास वाकचौरे हे प्रवरा सहकारी दूध संस्थेचे माजी चेअरमन असून विखे पाटील यांच्या माध्यमातून अकोले तालुक्यातील सामाजिक राजकीय कार्यामध्ये त्यांचा नेहमी सहभाग असतो. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हा नियोजन मंडळावर काम करण्याची संधी देण्यात आली आहे. सुजय दादा विखे पाटील यांनी ही नियुक्ती करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली आहे. यावेळी सन्मान करताना शिवसेनेचे मच्छिंद्र धुमाळ, भाजप सोशल मीडिया जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, विखे पाटील फाउंडेशनचे राजाराम वाकचौरे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष निखिल जगताप, भाजप महिला आघाडीच्या माजी तालुकाध्यक्ष रेश्मा गोडसे, सुगावचे माजी सरपंच दिलीपराव देशमुख, अमोल गोडसे यांच्यासह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### महावितरण कर्मचाऱ्यांची जिद्द



टिटवाळा (स. गांवकरी) : मांडा-टिटवाळा परिसरात मुसळधार पावसामुळे वीजवाहिनीवर नारळाचे झाड पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. वीज गेल्यानंतर "लाईट कधी येणार?" असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांकडून नेहमीच विचारला जातो. मात्र, वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी ऊन, पाऊस, चिखल आणि कंबरेएवढ्या पाण्यातही जीव धोक्यात घालून काम करत असतात. एक नंबर फिडरवरील गणेश नगर सोसायटी परिसरात नारळाचे झाड वीजवाहिनीवर पडले होते. या घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. भर पावसात वरिष्ठ तंत्रज्ञ बळीराम खडके यांनी क्रेनच्या सहाय्याने झाडावर चढून बेल्टने झाड बांधले आणि अत्यंत धोकादायक परिस्थितीत ते वीजवाहिनीवरून हटविले.

# श्री संत कोंडाजी बाबा डेरे पायी पालखी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान

निमगाव सावा : (स. गांवकरी)



श्री विठोबा सेवा ट्रस्ट शिरोली संचलित,शिरोली यांच्या वतीने पंढरीश परमात्मा श्री पांडुरंगाच्या असीम कृपेने आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या श्री संत कोंडाजी बाबा डेरे पायी पालखी सोहळ्याचे शिरोली-सुलतानपूर येथील श्री विठ्ठल मंदिरातून हजारो वारकरी व भाविकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या अखंड जयघोषात श्रीक्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले.

पालखी प्रस्थानाच्या वेळी संपूर्ण परिसर "ज्ञानोबा-तुकाराम", "पुंडलिक वरदे हरी विठ्ठल" आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजराने दुमदुमून गेला होता. पारंपरिक वेशभूषेतील वारकरी, डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला, भगव्या पताका, टाळ-मृदुंगाचा आणि विठ्ठलभक्तीचा उत्साह यामुळे वातावरण भक्तिरसाने ओथंबून गेले होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच भाविक मोठ्या श्रद्धेने या सोहळ्यात सहभागी झाले.

यावेळी विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. तसेच पारगाव तर्फे आळे मधून पंचायत समिती सदस्य संभाजी चव्हाण वारकऱ्यांना शुभेच्छा देत विठ्ठलनामाचा संदेश समाजात पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले. पालखीचा मार्ग शिरोली, सुलतानपूर, साळवाडी, निमगाव सावा, औरंगपूर, पारगाव तर्फे आळे, पिंपरी कावळ, जांबुत आदी गावांमधून निश्चित करण्यात आला असून प्रत्येक गावात ग्रामस्थांनी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत केले. अनेक ठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात आली तसेच पिण्याचे पाणी, फराळ, महाप्रसाद व वारकऱ्यांसाठी विविध सेवांची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली. ग्रामस्थांनी सेवा हीच ईश्वरसेवा मानत मोठ्या भक्तिभावाने या सोहळ्यात सहभाग नोंदविला.

यावर्षी पहिल्या दिवसाचा मुक्काम जांबुत या ठिकाणी घेण्यात आला पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा विणेकरी ह भ प बबन महाराज डुकरे यांची संपन्न झाली आयोजकांच्या वतीने पालखीतील प्रत्येक वारकऱ्याला चांगल्या प्रतीची प्रवासी बॅग मोफत भेट देण्याचे सांगण्यात आले. या उपक्रमाचे वारकरी आणि भाविकांनी मनापासून स्वागत करत श्री विठोबा सेवा प्रतिष्ठानचे विशेष कौतुक केले. या पालखी सोहळ्याचे अध्यक्ष व प्रवर्तक ह.भ.प. तुकाराम महाराज डावखर, उपाध्यक्ष चिमाजी सखाराम गाडगे, विणेकरी , चौपदार किसन महाराज गाडगे तसेच पत्रकार सुनिल गहिने, सहसचिव श्री एकनाथ शिवराम गुंजाळ सर, ह भ प रामदास महाराज मते, ह भ प अशोक महाराज तट्टू, उपस्थित सर्व सोहळा कमिटी यांनी संपूर्ण सोहळ्याच्या नियोजन, व्यवस्थापन आणि यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील वारकरी, ग्रामस्थ आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे श्री संत कोंडाजी बाबा डेरे पायी पालखी सोहळा अत्यंत शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न होत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाला. वारकरी संप्रदायातील श्रद्धा, सेवा, समता आणि भक्तीचा संदेश देणारा हा पालखी सोहळा परिसरातील भाविकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## कंबरेभर पाण्यातून रुग्णवाहिकेचा जीवघेणा प्रवास



टिटवाळा : (स. गांवकरी)

टिटवाळा गणपती मंदिर रोडवरील पटेल मार्टसमोर मुसळधार पावसामुळे कंबरेभर पाणी साचले आहे. या पाण्यातून कल्याण-डोंबिवली महापालिकेची रुग्णवाहिका वाट काढत जातानाचे दृश्य समोर आले आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांसह वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः रुग्णवाहिकेसारख्या अत्यावश्यक सेवेलाही पाण्यातून मार्ग काढावा लागत असल्याने परिसरातील जलनिस्सारण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पाण्याची पातळी वाढत असल्याने वाहन बंद पडण्याची तसेच अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तातडीने पाण्याचा निचरा करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## तालुक्यातील नागरीकांना टोलवसुलीत सुट दया : ग्राहक पंचायत

अकोले : (स. गांवकरी)



अकोले आदिवासी तालुक्यातील नागरिकांना वन्यजीव विभागाच्या टोल नाक्यावर होणारी वसूलीत निशुल्क प्रवेश मिळण्याबाबतचे निवेदन अकोले तहसीलचे महसूल विभागाचे नायब तहसिलदार प्रमोद सावंत यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, सचिव राम रुद्रे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की अकोले आदिवासी तालुक्यातील सर्व सामान्य, ज्येष्ठ नागरीक, महिला, मुले, अपंग इत्यादींना हरिश्चंद्रगड, वन्यजीव परिक्षेत्रात प्रवेश आणि पार्किंगसाठी वन्यजीव विभागाकडून टोलनाक्यावर इतर्स पर्यटकांप्रमाने रक्कम आकारण्यात येते. तसेच ही बाब अकोले तालुक्यातील सर्व सामान्य नागरीक भूमिपुत्रांवर अन्यायकारक व जाचक आहे. अकोले तालुक्याच्या जडनघडणीत अनेक स्वंतत्र सैनिक, भुमिगत सैनिक अनेकांचे मोठे योगदान आहे. व इतिहास आहे. अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगड, अमृतेश्वर मंदिर दर्शन, सांदनदरी, कळसुबाई, घाटघर, घाटन देवी इत्यादी ठिकानी अकोले आदिवासी तालुक्यातील नागरीक दर्शनासाठी, पर्यटनासाठी जात असतात. वन्यजीव विभागाकडून तपासणी नाक्यांवर प्रत्येक व्यक्तीसाठी वाहनासाठी शुल्कवसुल केले जाते. तालुक्यातुन फिरायला व दर्शनाला तालुक्यातील लोकांनाच कर रक्कम भरावा लागतोय ही बाब अतिशय क्लेशदायक व अर्थिक अन्यायकारक व मानसिक त्रासदायक आहे. अकोले भंडारदरा वन्यजीव परिक्षेत्रातील कोणत्याही तपासणी नाक्यावर अकोले तालुक्यातील स्थानिक नागरीकांकडून, रहिवाशांकडून प्रवेश शुल्क व पार्किंग शुल्क घेऊ नयेत वरील बाबींचा सहानुभुती पूर्वक विचार व्हावा अन्यथा अकोले तालुक्यातील नागरीक रस्ता रोको आंदोलन, व इतर्स मार्गाचा अवलंब करतील याची दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, सचिव राम रुद्रे, भगवान करवर, विश्वास देशमुख, प्रकाश कोरडे, रामदास पांडे, भाऊसाहेब आभाळे, दत्ता ताजणे, रजनीकांत भांगरे, सखाराम खतोडे, बबनराव तिकांडे, रामहारी तिकांडे, ज्ञानेश्वर पुंडे, शुभम माने, सखाहारी पांडे, सुनिल देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, शांताराम दराडे आदिंच्या सह्या आहे. निवेदनाच्या प्रती वन मंत्री गणेश नाईक, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वन परिक्षेत्र- वन्यजीव अधिकारी राजूर भंडारदरा यांना पाठविण्यात आल्या आहे.

## टिटवाळ्यातील रिजेन्सी सर्वम गृहप्रकल्पाचा कचरा प्लांट वर्षानुवर्षे बंद

**कचरा नदीत टाकत असल्याने जलप्रदूषणाचा धोका**

टिटवाळा : (स. गांवकरी)




टिटवाळ्यातील सर्वात मोठ्या गृहसंकुलांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रिजेन्सी सर्वम गृहप्रकल्पातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. सुमारे ३,५०० घरांचा समावेश असलेल्या या गृहप्रकल्पातील कचरा प्रक्रिया प्लांट कित्येक वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याची माहिती समोर आली आहे. प्लांट बंद असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचत असून, त्यातून तीव्र दुर्गंधी पसरत आहे. पावसाळ्यात या कचऱ्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ताप, डेंग्यू, मलेरिया तसेच इतर साथीच्या आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, साचलेला कचरा नदीच्या पाण्यात टाकला जात असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत. यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होत असून जलचरांसह परिसरातील पर्यावरणालाही धोका निर्माण होत आहे. या प्रकाराची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. गृहप्रकल्प प्रशासनाने कचरा प्रक्रिया प्लांट तातडीने सुरू करावा, नियमित कचरा उचलण्याची व्यवस्था करावी आणि नदीपात्रात कचरा टाकण्यास पूर्णतः बंदी घालावी, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. संबंधित महापालिका प्रशासन व प्रदूषण नियंत्रण विभागाने या प्रकरणाची दखल घेऊन त्वरित उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

याबाबत केडीएमसीचे घनकचरा विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की संबंधित बाबतचा व्हिडिओ आपल्याकडे आलेला असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया करू असे सांगितले.

## कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

टिटवाळा : (स. गांवकरी)



कल्याण तालुक्यात खरीप हंगामातील भात पिकासाठी पेरणी केलेल्या शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. २९ व ३० जून रोजी पेरणीयोग्य पाऊस झाल्याने तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी भात पेरणीला सुरुवात केली होती. दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात पेरण्या पूर्ण करण्यात आल्या. मात्र १ जुलैपासून सुरू झालेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पेरणी केलेले भात बियाणे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले, तर काही शेतांमध्ये उगवलेली भात रोपे पाण्यात बुडून राहिल्याने कुजून गेली आहेत. काही शेतकऱ्यांनी नवीन बियाणे खरेदी करून गादीवाफ्यावर पेरणी केली होती; मात्र ते बियाणेदेखील अतिवृष्टीमुळे कुजल्याची माहिती समोर आली आहे. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान झाले आहे. एकीकडे आर्थिक फटका बसला असून, दुसरीकडे पुनर्लागवडीसाठी आवश्यक रोपे उपलब्ध नाहीत. तसेच पुन्हा पेरणी करण्यासाठी भात बियाण्याचीही टंचाई जाणवत असल्याने खरीप हंगामातील भात पीक हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. कल्याण तहसीलदार कार्यालय आणि कृषी विभागाने तातडीने नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करून शेतकऱ्यांना बियाणे, रोपे व आर्थिक मदतीचा दिलासा द्यावा, अशी मागणी शेतीनिष्ठ शेतकरी गुरुनाथ दत्तात्रय सांबरे यांनी केली आहे.

## व्हिस्कासने चवीवर आधारित नवे कॅट फूड केले सादर

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह कॅट फूड ब्रँड व्हिस्कास® ने आज नवीन इंडियन फिश रेंज सादर केली. ही नवी रेंज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय आणि मोठ्या प्रमाणावर खाल्ल्या जाणाऱ्या रोहू आणि कतला या माशांपासून प्रेरित आहे. भारतीय घरांमध्ये परिचित असलेल्या माशांच्या चवीला व्हिस्कास® च्या विश्वासार्ह पोषणतज्ज्ञतेची जोड देत, या उत्पादनात व्हिस्कास® चे खास कुरकुरीत क्रीमी यम्मी पॉकेट्स ™ समाविष्ट करण्यात आले आहेत. हे कॅट फूड विशेषतः मांजरांसाठी तयार करण्यात आले असून, त्यातून 100 टक्के संपूर्ण आणि संतुलित पोषण मिळते. भारतीय पाळीव प्राणी पालकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले हे भारतातील या प्रकारचे पहिले नाविन्यपूर्ण उत्पादन आहे. ओम्निकॉम ॲडव्हर्टायझिंग इंडियाचा भाग असलेल्या 22फीट या संस्थेने या मोहिमेची संकल्पना तयार केली आहे. या मोहिमेत बॉलिवूड अभिनेत्री आणि मांजरप्रेमी मृणाल ठाकूर सहभागी झाली आहे. मांजरांसोबतचा तिचा वैयक्तिक अनुभव या मोहिमेला विश्वासार्हता आणि आपलेपणा देतो. त्यामुळे व्हिस्कास® च्या या पहिल्या इंडियन फिश रेंजची ओळख करून देण्यासाठी ती योग्य चेहरा ठरली आहे.




## अरेम फायनान्स आणि मायनस सीओ2 द्वारे पुण्यातील गृहनिर्माण सोसायटीमध्ये २४० किलोवॅट क्षमतेचा रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित

पुणे : (स. गांवकरी)




हवामान बदलावर लक्ष केंद्रित करणारी सौर ऊर्जा वित्तपुरवठा आणि उपाययोजना करणारी कंपनी एरेमने, पुण्यातील एका मोठ्या आठ-विंगच्या निवासी गृहनिर्माण सोसायटीसाठी २४० किलोवॅट क्षमतेच्या रूफटॉप सौर ऊर्जा प्रकल्पाला वित्तपुरवठा केला आहे. यामुळे सोसायटीला सामायिक क्षेत्रातील विजेची बिले लक्षणीयरीत्या कमी करण्यास आणि कमी-कार्बन, ईव्ही-सज्ज भविष्याकडे वाटचाल करण्यास मदत होईल. हा प्रकल्प मायनस सीओ2 द्वारे कार्यान्वित करण्यात आला, ज्याने या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत आणि त्याच्या सुरळीत वितरणात महत्त्वाची भूमिका बजावली. हा प्रकल्प 'पीएम सूर्य घर - मोफत वीज योजना'च्या व्यापक दिशेचेही प्रतिबिंब आहे, ज्याचा उद्देश अनुदान सहाय्य, सुलभ ग्राहक प्रक्रिया आणि रूफटॉप सिस्टीमची अधिक उपलब्धता याद्वारे भारतातील निवासी क्षेत्रात रूफटॉप सौरऊर्जेचा अवलंब वाढवणे आहे. सामूहिक गृहनिर्माण सोसायट्या आणि निवासी समुदायांसाठी, ही योजना ईव्ही चार्जिंग पायाभूत सुविधांसह सामायिक सुविधांच्या सौरऊर्जीकरणास समर्थन देते, ज्यामुळे सामायिक वीज खर्च कमी होण्यास मदत होते आणि सामुदायिक स्तरावर स्वच्छ ऊर्जेचा अवलंब मजबूत होतो. या संदर्भात, एरेम फायनान्सचे संरचित निधी मॉडेल आणि मायनस सीओ2 ची अंमलबजावणी क्षमता, सुरुवातीचे भांडवल आणि प्रकल्प वितरण या दोन अडथळ्यांना दूर करून, योजनेचा हेतू पुण्यात प्रत्यक्ष अंमलबजावणीत रूपांतरित करण्यास मदत करत आहेत. एरेमचे सह-संस्थापक श्री विकेश अग्रवाल म्हणाले."या पुणे गृहनिर्माण सोसायटीमध्ये, आमच्या वित्तपुरवठ्यासह केलेल्या माफक सुरुवातीच्या योगदानामुळे २४० किलोवॅट क्षमतेचा प्रकल्प, सुमारे ४३ लाख रुपयांचे सरकारी अनुदान लाभ आणि रहिवाशांना कालांतराने मिळणारी दीर्घकालीन ऊर्जा बचत शक्य झाली आहे. योग्य वित्तपुरवठा रचना मोठ्या निवासी समुदायांसाठी हेतूचे अंमलबजावणीत कसे रूपांतर करू शकते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे." "एका मोठ्या निवासी सोसायटीसाठी इतक्या मोठ्या प्रमाणावरचा प्रकल्प राबवण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन, समन्वय आणि सातत्यपूर्ण कामगिरीची आवश्यकता असते," असे मायनस सीओ2 चे व्यवस्थापकीय भागीदार आणि सीईओ, श्री सिद्धार्थ देशमुख म्हणाले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## शाळेची बस अडकली, विद्यार्थ्यांची ट्रॅक्टरमधून सुरक्षित सुटका

टिटवाळा (स. गांवकरी) : टिटवाळ्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. रीजन्सी सर्वम परिसरातील गणपती मंदिराकडे जाणारा मुख्य रस्ता पूर्णपणे पाण्याखाली गेला असून वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. वाढत्या पाण्यामुळे शाळेची बसही रस्त्यात अडकली. पाण्याची पातळी वाढल्याने एका शाळेची बसही रस्त्यामध्ये अडकली. बसमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना ट्रॅक्टरच्या सहाय्याने सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. परिसरातील अनेक रस्ते अजूनही पाण्याखाली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने नागरिकांना विनाकारण घराबाहेर पडू नये, तसेच पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवरून प्रवास टाळावा, असे आवाहन केले आहे.

## गळक्या शाळेत विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात; तातडीच्या दुरुस्तीची मागणी

टिटवाळा (स. गांवकरी) : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ५९ उंभर्णीतील सोनुभाऊ बसवंत प्राथमिक विद्यालया मधील इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गखोल्यांमध्ये पावसाळ्यात गळती होत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. शाळेच्या इमारतीत अनेक ठिकाणी पाणी झिरपत असून वर्गात बसून अभ्यास करणे विद्यार्थ्यांसाठी धोकादायक बनले आहे. याबाबत स्थानिक नगरसेविका तेजश्री हेमंत गायकवाड यांनी केडीएमसी प्रशासनाकडे निवेदन देत तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. पावसामुळे वर्गातील भिंती व छत ओले होत असून विद्यार्थ्यांना बसण्यास अडचणी येत आहेत. तसेच शाळेच्या परिसरात चिखल आणि पाण्याचे डबके साचत असल्याने विद्यार्थ्यांच्या ये-जा करण्यासही त्रास होत आहे. शाळेच्या इमारतीची तातडीने पाहणी करून गळती थांबविण्यासाठी आवश्यक दुरुस्ती करावी, तसेच परिसरातील चिखल व साचलेले पाणी हटवून विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत शहर अभियंता, प्रभाग अधिकारी आणि संबंधित शिवसेना पदाधिकाऱ्यांना देण्यात आली असून, केडीएमसी प्रशासन आता किती लवकर कारवाई करते याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.



## एफआरएनडी प्लॅटफॉर्ममुळे इलक्कियाला मिळाला आशा

मुंबई (स. गांवकरी) : २८ वर्षांच्या इलक्कियाच्या आयुष्याची सुरुवातच एका मोठ्या आघाताने झाली होती. जन्मतःच आईचे छत्र हरवल्यामुळे तिच्या वडिलांनीच तिचे विश्व व्यापले होते, तेच तिचे सर्वस्व आणि आधारस्तंभ होते. मात्र, कोव्हिड-१९ च्या महाभयंकर लाटेने तिचा हा एकमेव आधारही हिरावून घेतला आणि इलक्किया पूर्णपणे एकाकी झाली. जवळच्या व्यक्तींना गमावल्यामुळे तिच्या मनात एक खोल भीती बसली होती, ज्यामुळे ती लोकांपासून, विशेषतः पुरुषांशी बोलताना कमालीची संकोचू लागली होती. तिच्या या शांत आणि एकाकी आयुष्यात एफआरएनडी या ॲपच्या रूपाने एक आशेचा किरण चमकला. हे केवळ एक तंत्रज्ञान नसून, ग्रामीण आणि निमशहरी भागातील लोकांसाठी बनवलेले एक सुरक्षित डिजिटल जग आहे. मराठीसह १४ भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या या व्यासपीठामुळे इलक्कियाला स्वतःच्या भावना आपल्या भाषेत मांडण्याचे बळ मिळाले. इलक्कियाची ही गोष्ट केवळ एका यशस्वी विवाहाची नाही, तर ती एका स्त्रीच्या पुनर्जन्माची आहे. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून तिने केवळ जोडीदारच मिळवला नाही, तर आर्थिक स्वातंत्र्यही प्राप्त केले. या ॲपमधील कामातून मिळालेल्या उत्पन्नाच्या जोरावर तिने तिचे अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण केले. ज्या मुलीला कधीकाळी लोकांशी बोलताना शब्द फुटत नसत, ती आज एक व्यावसायिक वकील म्हणून न्यायालयात इतरांसाठी न्याय मागत आहे. एका सुरक्षित डिजिटल प्लॅटफॉर्मने दिलेल्या साथीमुळे इलक्कियाचे आयुष्य शून्यातून पुन्हा उभे राहिले, जे खऱ्या अर्थाने 'व्हॉइस टू व्हिक्टरी' (आवाजाकडून विजयाकडे) नेणारा प्रवास ठरला आहे.

## सोनालिका ट्रॅक्टर्सने सर्वाधिक ५३,६६१ ट्रॅक्टर विक्रीची केली नोंद



पुणे (स. गांवकरी) : भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने विक्रमी कामगिरीसह आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीचा टप्पा पूर्ण केला असून केवळ ३ महिन्यांत ५० हजार ट्रॅक्टरची विक्री केली आहे. याद्वारे कंपनीने पहिल्या तिमाहीत आजवरच्या सर्वाधिक ५३,६६१ ट्रॅक्टर विक्रीची नोंद केली आहे. कंपनीने एकूण २३.१ टक्के एवढी अचंबित करणारी वाढ साध्य केली असून उद्योगाच्या कामगिरीला (अंदाजे १८.३ टक्के) मागे टाकले आहे. एप्रिल-जून २६ मध्ये देशांतर्गत बाजारपेठेतील सर्वाधिक वाटा मिळवत ती गौरवाने उभी आहे. या नव्या यशामुळे आपल्या नावीन्यपूर्ण ट्रॅक्टर तंत्रज्ञानासह 'जीतने का दम' देण्याच्या कंपनीच्या कायमस्वरूपी भावनेला, तसेच गेल्या ३ दशकांपासून ब्रँडची प्रेरक शक्ती म्हणून कायम असलेल्या अपवादात्मक ग्राहक समाधानाची पुष्टी झाली आहे. सोनालिकाच्या सातत्यपूर्ण वाढीतून अधिकतम मूल्याने जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान भारतीय शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची सोनालिकाची कटिबद्धता अधोरेखित होते. नव्याने सुरू झालेल्या सोनालिका गोल्ड ट्रॅक्टर सीरिजला चालू खरीप हंगामात शेतकऱ्यांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये सर्वात मोठे ३ सिलिंडर ३,५३२ सीसी इंजिन आणि शेतकऱ्यांना नफा मिळावा, यासाठी डिझाईन केलेली इतर कामगिरीकेंद्रीत वैशिष्ट्ये आहेत. या वेगवान वाटचालीला शक्ती पुरविण्यासाठी सोनालिकाचा जगातील सर्वात मोठा एकात्मिक ट्रॅक्टर प्लांट आहे. त्याला जागतिक संशोधन आणि विकास क्षमता आणि प्रिसिजन इंजिनिअरिंगमधील सातत्यपूर्ण गुंतवणूकीचा आधार आहे. त्यातून एकत्रितपणे सोनालिकाला जगभरातील शेतकऱ्यांसाठी 'वन स्टॉप सोल्यूशन पार्टनर' म्हणून काम करण्याची शक्ती मिळते.

# वारकऱ्यांची सेवा म्हणजे पांडुरंग परमात्म्याचीच सेवा

### मुरलीधर मोहोळ यांचे प्रतिपादन; वारकऱ्यांसाठी फिरता दवाखाना उपक्रमाचा शुभारंभ

- 'सिंबायोसिस' व सौ शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्टतर्फे वारंकऱ्यांसाठी २६ वर्षांपासून उपक्रम



पुणे : (स. गांवकरी)

"आषाढी वारी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक व वैभवशाली परंपरा आहे. श्रीक्षेत्र देहू व आळंदी येथून लाखो वारकरी ज्ञानोबा-तुकोबाची पालखी खांद्यावर घेऊन विठूनामाचा गजर करत पंढरपूरच्या वाटेवर चालत आहेत. पायी वारीत चालून थकलेल्या, शिणलेल्या या वारकऱ्यांची सेवा म्हणजे साक्षात पांडुरंगाची सेवा असून, हे पुण्याचे काम आपल्या हातून होतेय, याचे समाधान आहे," असे प्रतिपादन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतुक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले. सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठ आणि सौ. शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी पंढरपूर प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने 'फिरता वारकरी दवाखाना' या उपक्रमाचे उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झाले. सेनापती बापट रस्त्यावरील सिम्बायोसिस भवनात झालेल्या कार्यक्रमावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, महापालिकेतील विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम, ॲड. अविनाश साळवे, 'सिंबायोसिस'चे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, माजी आमदार उल्हास पवार, मोहन जोशी, 'सिम्बायोसिस'चे डॉ. राजीव येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण, अधिष्ठाता डॉ. शशीधर उपस्थित होते.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, "भक्तिमय वातावरणात पालखी सोहळ्याला सुरुवात झाली असून, राज्यभरातून लाखो वारकरी या वारीत चालतात. पुण्यातील अनेक संस्था आपापल्या परीने वारकऱ्यांच्या सेवेसाठी झटत असतात. विठुरायाच्या भेटीसाठी ऊन-वारा, पाऊस, तहान-भूक विसरून निघालेल्या या वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी घेतलेला हा ज्ञानदानाच्या पलीकडे जाऊन सामाजिक भान जपणारा आहे."

मंजुषा नागपुरे म्हणाल्या, "गेल्या २६ वर्षांपासून अविरतपणे सकारात्मक ऊर्जा देणारा हा उपक्रम स्तुत्य आहे. वारकरी सेवेचे हे व्रत इतरांसाठीही प्रेरक आहे. वारकऱ्यांचे दुःख हलके करण्याचे, त्यांना वारीत चालताना अडचणी येऊ नयेत, यासाठी औषधे व आरोग्य सेवा देतानाच आपल्या हातून पांडुरंगाची सेवा घडत आहे. पालिकेच्या वतीनेही वारकऱ्यांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत."

# एचडीएफसी अर्गो करणार फसल बिमा योजनेची अंमलबजावणी

पुणे : (स. गांवकरी)

एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी या भारतातील खाजगी क्षेत्रातील आघाडीच्या सर्वसाधारण विमा कंपनी ला प्रधान मंत्री फसल बिमा योजना (पीएमएफबीवाय) च्या अंमलबजावणीसाठी प्राधिकृत केले असून ही योजना २०२६ च्या खरीप हंगामातील पिकांसाठी असून अकोला, धुळे, हिंगोली, जळगाव, पुणे सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांसाठी कर्जधारक आणि कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी लागू असेल. ही योजना महाराष्ट्र शासनाने योजनेअंतर्गत अधिसूचित केलेल्या खाली नमूद पिकांसाठी संबंधित जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येईल. सर्व पिके आणि जिल्ह्यांसाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. पीएमएफबीवाय योजना शेतकऱ्यांना दुष्काळ, पूर, पावसाने ओढ घेणे, भूस्खलन, चक्रीवादळे, वादळे, गारपीट, पुरस्थिती, कीड, रोग आणि इतर अशा विविध बाह्य जोखमींमुळे होणाऱ्या पीक उत्पादनातील नुकसानीविरुद्ध विमा संरक्षण प्रदान करते. उत्पादनातील नुकसान निश्चित करण्यासाठी, राज्य सरकार या योजनेसाठी अधिसूचित केलेल्या क्षेत्रांमध्ये अधिसूचित पिकांवर क्रॉप कटिंग एक्सपिरिमेंट (सीसीईज) नियोजित करून राबवेल. जर घेतलेल्या सीसीईज च्या आधारे उपलब्ध झालेल्या उत्पादनाच्या आकडेवारीवरून उत्पादन कमी असल्याचे निष्पन्न झाले, तर संबंधित शेतकऱ्यांच्या पीक उत्पादनात तूट झाल्याचे मानले जाईल आणि त्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना दावा रक्कम अदा केली जाईल.

# रक्ताच्या कर्करोगावरील अत्याधुनिक उपचारांना नवी दिशा

पुणे : (स. गांवकरी)



हडपसर येथे राहणारे 46 वर्षीय मेकॅनिकल इंजिनिअर ऋतिक मेहरा यांच्यासाठी जानेवारी 2026 मधील नियमित वार्षिक आरोग्य तपासणी आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. कोणतीही लक्षणे नसताना आणि नेहमीप्रमाणे काम सुरू असतानाच त्यांच्या रक्त तपासणीत हिमोग्लोबिनचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे आढळले. पुढील तपासणीत त्यांना IgA लॅम्बडा (Lambda) मल्टीपल मायलोमा या अस्थिमज्जेतील प्लाझ्मा पेशींमध्ये होणाऱ्या रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. IgA लॅम्बडा (Lambda) मल्टीपल मायलोमा हा प्लाझ्मा पेशींचा (Plasma Cells) एक प्रकारचा कर्करोग आहे, ज्यामध्ये शरीरातील असामान्य प्लाझ्मा पेशी लॅम्बडा लाईट चेन (Lambda Light Chain) नावाचे मोनोक्लोनल प्रोटीन जास्त प्रमाणात तयार करतात। सामान्यतः आपल्या शरीरातील प्लाझ्मा पेशी संसर्गाशी लढण्यासाठी अँटीबॉडीज बनवतात, परंतु या आजारात त्या निकामी आणि हानिकारक प्रोटीन्स बनवू लागतात.

"उपचारांपेक्षा कर्करोगाचे निदान स्वीकारणे माझ्यासाठी अधिक कठीण होते," असे ऋतिक मेहरा यांनी सांगितले. "मी पूर्णपणे सामान्य आयुष्य जगत होतो आणि मला कोणतीही लक्षणे नव्हती. नियमित आरोग्य तपासणीतून अचानक कर्करोग झाल्याचे समजल्याने मोठा धक्का बसला.

# मॅक्सियन व्हील्सच्या भारतातील पहिल्या 'फॉमरि' बॅचचा पदवीदान सोहळा संपन्न

पुणे : (स. गांवकरी)




प्रवासी कार, हलकी व्यावसायिक वाहने, बस, जड व्यावसायिक वाहने आणि ट्रेलर्ससाठी चाके (व्हील्स) तयार करणाऱ्या जागतिक आघाडीच्या मॅक्सियन व्हील्सने आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भारतातील 'फॉमरि' कार्यक्रमाच्या पहिल्या तुकडीच्या विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याच आयोजित समारंभात या कार्यक्रमाच्या दुसऱ्या तुकडीचेही उद्घाटन करण्यात आले.यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, मॅक्सियन व्हील्सचे ग्लोबल ह्युमन रिसोर्सेस, सेफ्टी अँड सस्टेनेबिलिटी विभागाचे उपाध्यक्ष मार्क सिनार, कल्याणी मॅक्सियन व्हील्सचे व्यवस्थापकीय संचालक राहुल वैद्य, विद्यापीठाचे प्रतिनिधी, पदवीधर आणि नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

या समारंभात पुण्यातील 'फॉमरि'च्या दुसऱ्या तुकडीचेही उद्घाटन करण्यात आले. या तुकडीत २७ विद्यार्थी असून, त्यापैकी ६ विद्यार्थिनींचा (२२ टक्के) सहभाग आहे. या वेळी विद्यार्थ्यांनी 'फॉमरि'मुळे त्यांच्या आयुष्यात झालेल्या सकारात्मक बदलांविषयी मनोगत व्यक्त केले. ब्राझीलमधील आयोश्पे फाउंडेशन (Iochpe Foundation) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने २०२४ मध्ये भारतात सुरू करण्यात आलेला 'फॉमरि' हा व्यावसायिक प्रशिक्षण आणि शैक्षणिक शिष्यवृत्ती कार्यक्रम मूळचा दक्षिण अमेरिकेतील आहे. वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तरुणांना सैद्धांतिक शिक्षणासोबतच उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव देऊन त्यांना रोजगारक्षम बनविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पहिल्या तुकडीचे पदवीदान हा आशियातील या कार्यक्रमाच्या विस्तारातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

पहिल्या 'फॉमरि' तुकडीत एकूण २६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यापैकी २३ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करून मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलॉजी विषयातील डिप्लोमा प्राप्त केला.

यापुढे एसपीपीयूमध्ये तिसऱ्या वर्षाचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाची पदवीही मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीला अधिक बळ मिळणार आहे. विशेष म्हणजे, पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ८७ टक्के विद्यार्थ्यांना पुण्यातील मॅक्सियन व्हील्समध्ये करिअरची संधी मिळणार असून, कौशल्यपूर्ण मनुष्यबळ तयार करण्याबरोबरच अर्थपूर्ण रोजगारनिर्मितीतही या कार्यक्रमाने यश मिळविल्याचे अधोरेखित झाले आहे. मॅक्सियन व्हील्स आशिया बिझनेस युनिटचे अध्यक्ष सुदीप रत्नभास म्हणाले, "भारतातील 'फॉमरि'च्या पहिल्या तुकडीचे पदवीदान हा आमच्या विद्यार्थ्यांसाठी आणि मॅक्सियन व्हील्ससाठी अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे.

शिक्षण आणि कौशल्यविकासातील गुंतवणूक व्यक्तींचे आयुष्य बदलू शकते, तसेच समाज आणि उद्योगक्षेत्र अधिक सक्षम करू शकते, यावर आमचा ठाम विश्वास आहे. या तरुणांनी आपल्या व्यावसायिक प्रवासाची सुरुवात आमच्याच संस्थेत करणे ही आमच्यासाठी विशेष आनंदाची बाब आहे."

# सौदीकडून 'पॅकेज व्हिसा'ची घोषणा; प्रवास बुकिंगसह व्हिसा अर्ज प्रक्रिया होणार सुलभ

रियाध : (स. गांवकरी)




जगभरातील पर्यटकांसाठी प्रवास अधिक सोपा आणि अखंड करण्याच्या उद्देशाने सौदी अरेबियाने 'पॅकेज व्हिसा' हा नवा डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत पर्यटक व्हिसासाठीची अर्ज प्रक्रिया थेट प्रवास बुकिंगशी जोडण्यात आली असून, विमानप्रवास, निवास व्यवस्था आणि व्हिसा अर्ज ही संपूर्ण प्रक्रिया एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर पूर्ण करता येणार आहे.

या उपक्रमाची अंमलबजावणी सुरुवातीला निवडक आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये पात्र प्रवास आणि पर्यटन सेवा प्रदात्यांमार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येत असून, पुढील काळात त्याचा व्यापक विस्तार करण्यात येणार आहे.

सौदी सरकारने यापूर्वी ई-व्हिसा, व्हिसा ऑन अरायव्हल आणि स्टॉपओव्हर ट्रान्झिट व्हिसा यांसारखे विविध प्रवेश पर्याय उपलब्ध करून पर्यटन क्षेत्राला चालना दिली आहे. या उपाययोजनांमुळे २०२५ मध्ये सौदीने २९ दशलक्षांहून अधिक आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे स्वागत केले.

सौदीचे पर्यटन मंत्री Ahmed Al Khateeb यांनी सांगितले की, पर्यटन क्षेत्राच्या वेगवान विस्ताराच्या पार्श्वभूमीवर 'पॅकेज व्हिसा' हा उपक्रम पर्यटकांचा संपूर्ण प्रवास अधिक सुलभ, जोडलेला आणि अखंड करण्याच्या देशाच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. व्हिसा प्रक्रिया थेट प्रवास बुकिंगशी जोडल्यामुळे पर्यटकांना अधिक सोयीस्कर अनुभव मिळणार असून, पर्यटन क्षेत्रातील विविध भागधारकांमधील समन्वयही अधिक मजबूत होणार आहे.

या नव्या सुविधेमुळे पात्र प्रवासी स्वतंत्रपणे विमान तिकीट, हॉटेल आणि व्हिसा अर्ज करण्याऐवजी एकाच प्रक्रियेद्वारे सर्व सेवा बुक करू शकतील. याशिवाय, पर्यटनस्थळे, विविध उपक्रम आणि अनुभव यांचाही समावेश प्रवास पॅकेजमध्ये करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे बुकिंगपासून सौदीमध्ये आगमनापर्यंतचा संपूर्ण प्रवास अधिक सुसंगत आणि त्रासमुक्त होईल. पात्र प्रवास आणि पर्यटन सेवा प्रदात्यांसाठीही हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असून, अधिक आकर्षक प्रवास पॅकेजेस सादर करण्याची, पर्यटकांचा मुक्काम वाढविण्याची आणि त्यांना अधिक समृद्ध पर्यटन अनुभव देण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सौदी सरकारने स्पष्ट केले आहे की, 'पॅकेज व्हिसा' सुविधा केवळ निश्चित सेवा मानकांची पूर्तता करणाऱ्या आणि २४x७ ग्राहक सहाय्य उपलब्ध करून देणाऱ्या अधिकृत प्रवास व पर्यटन सेवा प्रदात्यांमार्फतच दिली जाणार आहे.

पर्यटन क्षेत्राचा सातत्याने विस्तार करत असलेल्या सौदीसाठी 'पॅकेज व्हिसा' हा जागतिक पर्यटकांना अधिक सहज, सुरक्षित आणि अखंड प्रवासाचा अनुभव देण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# पुण्यात नवीन प्रकल्प सादरीकरणात १७% वार्षिक वाढ होऊनही निवासी विक्री स्थिर

पुणे : (स. गांवकरी)

- नाईट फ्रँक इंडिया

नाईट फ्रँक इंडियाने आपल्या 'इंडिया रिअल इस्टेट H1 2026', या ताज्या अहवालात पुण्याच्या स्थावर मालमत्ता क्षेत्रातील सातत्यपूर्ण गतीवर प्रकाश टाकला असून, 2026 च्या पहिल्या सहामाहीत निरोगी निवासी मागणी कायम राखत शहराने आतापर्यंतचा सर्वाधिक अर्ध-वार्षिक कार्यालयीन भाडेपट्टा नोंदवला आहे. कार्यालयीन बाजारपेठेत एकूण 6.6 दशलक्ष चौरस फूट भाडेपट्टा व्यवहार झाले, जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील उच्च आधारभूत पातळी असूनही वार्षिक 29% वाढ दर्शवतात. ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स (GCC), फ्लेक्स ऑपरेटर्स आणि थर्ड-पार्टी IT/ITeS कंपन्यांकडून मजबूत मागणीमुळे ही वाढ झाली, तसेच मोठ्या आकाराचे व्यवहार आणि ग्रेड A कार्यालयीन विकासासाठी सातत्यपूर्ण मागणीचाही यात हातभार लागला. निवासी क्षेत्रात, पुण्यात अंतिम-वापरकर्त्यांकडून निरोगी मागणी कायम राहिली असून H1 2026 मध्ये 24,890 घरांची विक्री झाली, जी वार्षिक 2% वाढदर्शवते. बाजारपेठेच्या दृष्टिकोनाबाबत विकासकांचा आत्मविश्वास कायम राहिला असून त्यांनी 31,116 नवीन घरांचे सादरीकरण केले, जी वार्षिक 17% वाढ दर्शवते. निवासी किमतीही चढत्या क्रमाने वाढत राहिल्या असून त्या वार्षिक 5% ने वाढून सरासरी ₹10,063 प्रति चौरस फूट झाल्या. पुण्याच्या कार्यालयीन बाजारपेठेने H1 2026 मध्ये आतापर्यंतची सर्वात मजबूत अर्ध-वार्षिक भाडेपट्टा कामगिरी नोंदवली, ज्यामुळे भारतातील आघाडीच्या व्यावसायिक कार्यालयीन गंतव्यस्थानांपैकी एक म्हणून शहराचे वाढते महत्त्व अधोरेखित होते. मागील वर्षी उच्च भाडेपट्टा पातळी असूनही, विविध क्षेत्रांमधील सातत्यपूर्ण भाडेकरू मागणीमुळे एकूण कार्यालयीन व्यवहार 6.6 दशलक्ष चौरस फूट इतके झाले.

# 'लॉक अप: सच या सज़ा' मध्ये गौरव खन्नाची सरप्राईज एन्ट्री

मुंबई : (स. गांवकरी)



नेटफ्लिक्सवरील लोकप्रिय रिॲलिटी शो **'लॉक अप: सच या सज़ा'**च्या ताज्या भागात अभिनेता गौरव खन्ना याने सरप्राईज गेस्ट म्हणून एन्ट्री करत प्रेक्षकांना भावूक केले. त्याच्या अनपेक्षित आगमनामुळे स्पर्धक आकांक्षा चमोला हिच्यासोबत भावनिक पुनर्भेट झाली. गौरवला पाहताच आकांक्षा भावूक झाली. तिचे अश्रू अनावर झाले असताना गौरवने तिला धीर देत वैयक्तिक अडचणी बाजूला ठेवून स्पर्धेवर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला. यावेळी गौरव म्हणाला, "मी इथे आलो कारण तू अस्वस्थ असल्याचे मला दिसले. तुला पाठिंबा देण्यासाठीच आलो आहे. खंबीर राहा. प्रेक्षकांना तुझा आनंदी आणि मनोरंजक स्वभाव पाहू दे." दोघांच्या घटस्फोटाबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही गौरवने प्रथमच स्पष्ट भूमिका मांडली. तो म्हणाला, "हे आता राष्ट्रीय चर्चेचा विषय बनले आहे. आम्ही कायदेशीर मार्ग स्वीकारण्याचा विचार केला होता, मात्र अद्याप कोणतीही कायदेशीर प्रक्रिया सुरू झालेली नाही. सध्या तू तुझ्या खेळावर लक्ष केंद्रित कर." या भावनिक संवादानंतर हा प्रसंग सोशल मीडियावर आणि प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय ठरला. गौरव आणि आकांक्षाच्या नात्याबाबत पुन्हा एकदा विविध चर्चांना उधाण आले आहे.

# काय हा जगद्धात्री आणि मूसामधील संघर्षाचा शेवट आहे?

## सोनाक्षी बत्रा म्हणाली, "यापेक्षाही काहीतरी मोठे अजून बाकी आहे..."

पुणे : (स. गांवकरी)



झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' मालिकेत हल्ली पार पडलेल्या भागांमध्ये शिवाय (फर्मान हैदर) आणि जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) यांच्या लग्नसोहळ्यामुळे प्रेक्षकांचे लक्ष विशेष वेधून घेतले. यासोबतच मालिकेत आणखी एक महत्त्वाचे कथानक उलगडत आहे आणि ते म्हणजे मूसाचा शोध घेण्यासाठी जगद्धात्रीने हाती घेतलेले धोकादायक आणि रोमांचक मिशन.

मूसाचा शोध घेणे हे जगद्धात्रीसाठी आतापर्यंतच्या तिच्या प्रवासातील सर्वांत मोठ्या आणि महत्त्वाच्या मिशनपैकी एक ठरले आहे. सातत्याने धागेदोरे शोधत आणि सत्याच्या अधिकधिक जवळ पोहोचत हे मिशन आता अत्यंत निर्णायक टप्प्यावर येऊन पोहोचले आहे. आगामी भागांमध्ये प्रेक्षक जगद्धात्रीला थेट ॲक्शन मोडमध्ये पाहतील, जिथे तिचा सामना मूसासोबत होणार आहे. हा प्रसंग नाट्यमय आणि भावनिकदृष्ट्या अत्यंत प्रभावी असणार आहे. मात्र, मूसाला पकडणे हेच अंतिम ध्येय वाटत असले तरी जगद्धात्रीच्या मिशनचा तो शेवट नाही. अजूनही अनेक मोठी सत्ये पडद्याआड दडलेली आहेत आणि काही नवीन रहस्येही उलगडणार आहेत, त्यामुळे कथेत आणखी एक मोठा ट्विस्ट येणार आहे.

या रोमांचक टप्प्याबद्दल आणि जगद्धात्रीसमोर उभ्या राहणाऱ्या आगामी आव्हानांविषयी बोलताना ह्या मालिकेत मुख्य भूमिका साकारणारी सोनाक्षी बत्रा म्हणाली, "जगद्धात्री गेल्या काही काळापासून मूसापर्यंत पोहोचणे, सत्याचा उलगडा करणे आणि अखेर या अध्यायाचा शेवट करण्याच्या एका अत्यंत महत्त्वाच्या आणि आव्हानात्मक मिशनवर आहे. आणि आता तो क्षण अखेर आला आहे. प्रेक्षकांना आता जगद्धात्रीचा रौद्र दुर्गावतार पाहायला मिळणार आहे. मूसाचा सामना करण्यासाठी आणि ती ज्या उत्तरांचा शोध घेत आहे ती मिळवण्यासाठी ती पूर्णपणे निर्धाराने उभी राहिलेली प्रेक्षकांना दिसेल. हे आगामी भाग अत्यंत प्रभावी असणार आहेत कारण त्यात ॲक्शन, भावना आणि थरारक नाट्य यांचा संगम पाहायला मिळेल. मात्र, हा जगद्धात्रीच्या मिशनचा शेवट नाही. मूसा हा तिच्या मिशनचा एक महत्त्वाचा भाग असला तरी पुढे यापेक्षाही काहीतरी मोठे तिची वाट पाहत आहे.

तसेच कथेत आणखी एक मोठा ट्विस्ट येणार आहे, जो सर्व काही बदलून टाकेल. जगद्धात्रीचे मिशन अजूनही संपलेले नाही आणि पुढे जे काही घडणार आहे त्याचा सामना करण्यासाठी तिला पूर्वीपेक्षा अधिक खंबीर राहावे लागणार आहे.








# हार्दिक अभिनंदन!

अहिल्यानगर जिल्हा
नियोजन समितीच्या
**सदस्यपदी**

## मा. विकासराव वाकचौरे

यांची झालेली निवड ही त्यांच्या
समाजाभिमुख कार्याची, विकासदृष्टीची
आणि जनसेवेतील सातत्यपूर्ण
योगदानाची पावती आहे.





थोर समाजसेवक, दानशूर
**शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर** (ठाणावाला)
समूह संपादक – दैनिक समर्थ गांयकरी

### परीघाताई विश्वास आरोटे

- अध्यक्षा – मुक्ताई मंजू सहकारी संस्था
- उपाध्यक्षा – संगमनेर-अकोले तालुका महिला शिक्षण प्रसारक संस्था
- संचालिका – चितळवेढे विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी
- संचालिका – महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, अकोले
- संचालिका – अर्थानंद ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, विरगाव
- अध्यक्षा – गांव्करी सामाजिक चॅरिटेबल ट्रस्ट
- अध्यक्षा – सोनेरी छत्रपती उद्योग समूह

### डॉ. विश्वासराव आरोटे

- राज्य सरचिटणीस – महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
- राज्य सरचिटणीस – महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई
- मालक व संपादक – दैनिक समर्थ गांयकरी
- प्रदेश उपाध्यक्षा – समाज कल्याण न्यास संस्था, महाराष्ट्र राज्य
- संचालक – अकोले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, अकोले
- संपादक – ए.व्ही.पी. न्यूज चॅनेल
- संपादक – गांयकरी न्यूज बुलेटीन